रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
वर्ष १६ ◆ अंक ३१६
www.ramprahar.com
सोमवार, ३ जून २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## एक्झिट पोलच्या अंदाजानंतर पीएम मोदी जोमाने कार्यरत



**नवी दिल्ली :** लोकसभा निवडणुकीसाठीचे एकूण सात टप्प्यांतील मतदान संपले आहे. त्यानंतर आता सर्वांना ४ जून रोजी जाहीर केल्या जाणाऱ्या निकालाची प्रतीक्षा आहे. दरम्यान, वेगवेगळ्या माध्यम संस्थांच्या एक्झिट पोलमध्ये देशात पुन्हा एकदा भाजप सरस ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. एक्झिट पोलच्या या पूरक अंदाजानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी जोमाने कामाला लागले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतरच्या १०० दिवसांचा प्लॅन तयार केला आहे. त्यासाठी तयारीदेखील चालू झाली आहे. एक्झिट पोलच्या अंदाजानुसार या वेळीही भाजपप्रणित एनडीए आघाडी पुन्हा एकदा सत्तेत येण्याची शक्यता आहे. तसे झाल्यास नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतील व सरकार स्थापन करतील.

अंतरंग
उद्धव ठाकरेंचे एनडीएत येण्यासाठी प्रयत्न -केसरकर/२
मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वीकेण्डला वाहनांच्या रांगा/५
कर्जतमधील वर्षासहलींवरील बंदी उठवण्याची मागणी/७

### लोकसभा निकालापूर्वी ईशान्य भारतात भाजपला यश

# अरुणाचल प्रदेशात विजयी हॅट्ट्रिक

**इटानगर : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणूक निकालाच्या आधीच भारतीय जनता पक्षामध्ये जल्लोष सुरू झाला आहे. अरुणाचल प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपने ४६ जागांवर विजय मिळवला असून मागच्या टर्मचा स्वतःचाच रेकॉर्ड त्यांनी मोडला आहे. त्यामुळे भाजप पुन्हा एकदा अरुणाचल प्रदेशमध्ये सत्ता स्थापन करण्यास सज्ज झाला आहे.



अरुणाचल प्रदेशमध्ये ६० विधानसभा जागांसाठी १९ एप्रिल रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. येथे ८२.९५ टक्के मतदान झाले होते, तर रविवार (दि.२) सकाळपासून मतमोजणीला सुरुवात झाली. अरुणाचल प्रदेशमध्ये भाजपने मतदानापूर्वीच १० जागांवर बिनविरोध विजय मिळवला होता, तर मतमोजणीत निवडणूक आयोगाच्या अधिकृत संकेतस्थळानुसार भाजपच्या पारड्यात ४६ जागा आल्या आहेत. तिथे बहुमतासाठी ३१ जागा गरजेच्या आहेत. त्यामुळे अरुणाचल प्रदेशमध्ये भाजप एकहाती सत्ता स्थापन करणार आहे.

अरुणाचल प्रदेशमध्ये नॅशनल पीपल्स पार्टीने (एनपीईपी) पाच आणि पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचल (पीपीए)ने दोन जागा जिंकल्या आहेत, तर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसला तीन जागी यश आले आहे. याशिवाय अपक्षांना तीन आणि काँग्रेसला अवघी एक जागा मिळाली आहे. अरुणाचल प्रदेशमध्ये भाजप तिसऱ्यांदा विजयी झाल्याने जल्लोष सुरू झाला आहे. मुख्यमंत्री आणि भाजप नेते पेमा खांडू तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदावर बसणार आहेत.

### सिक्कीममध्ये ‘एसकेएम’ने राज्याची सत्ता राखली

सिक्कीममध्ये सत्ताधारी सिक्कीम क्रांतिकारी मोर्चा (एसकेएम)ने ३२पैकी २० जागा मिळवून विजय मिळवला आहे, तर सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रंट (एसडीएफ) पराभूत झाले आहेत. सिक्कीममध्ये एकूण ७९.८८ टक्के मतदान झाले होते.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गोरगरीबांचे आधारवड माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वाढदिवसानिमित्त रविवारी (दि. २) सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवर व हितचिंतकांनी अभीष्टचिंतन केले. समाजोपयोगी उपक्रमांनी वाढदिवस साजरा झाला.



(अधिक छायाचित्रे पान ६ व ८ वर..)

दानशूर, कर्तृत्ववान व्यक्तीला वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी हितचिंतकांनी मोठी गर्दी केली होती. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, पुत्र आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, स्नुषा वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, नातू अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर आदी कुटुंबीय उपस्थित होते.



वाढदिवसानिमित्त कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेच्या वतीने ’एक कृतार्थ संध्याकाळ’ या साहित्यिक कार्यक्रमांतर्गत पनवेलमध्ये कविसंमेलन, सन्मान पुरस्कार व सत्कार सोहळा, कोशिश फाउंडेशनच्या वतीने ओएनजीसी गेटसमोर वृक्षारोपण, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये प्रदीपशेठ भगत युवा मंचच्या वतीने आरोग्य शिबिर, खारघर आचार्य अत्रे गार्डन येथे सिनर्जी अकॅडमीच्या वतीने वृक्षारोपण, प्रवीण स्पोर्ट्स असोसिएशनच्या वतीने खारघर शहरातील दहावी व बारावीच्या उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा, खारघर स्पोर्ट्स अकॅडमी व युवा प्रेरणा सामाजिक संस्थेच्या वतीने फर्स्ट टॉप रँकिंग ओपन रोड रोलर स्केटिंग, उत्कर्ष सांस्कृतिक, कला आणि क्रीडा मंडळ तसेच आम्ही रक्तदाते संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने नवीन पनवेल येथे रक्तदान शिबिर, हार्मनी फाउंडेशन आणि आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने पोशीर येथे मोफत नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि चष्मेवाटप शिबिर अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दरम्यान, आमदार प्रशांत ठाकूर यांनीही नवीन पनवेलमधील शिबिरामध्ये रक्तदान केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, माजी आमदार देवेंद्र साटम, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, माजी पं.स.सदस्य रत्नप्रभा घरत, निलेश पाटील, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, चारुशीला घरत, सीताताई पाटील, **(पान २ वर..)**

## संजय राऊत अतिविद्वान; नाना पटोलेंचा टोला

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत सांगली लोकसभेच्या जागेवरून महाविकास आघाडीमध्ये मोठा पेच निर्माण झाला होता. ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यात तू तू मै मै झाल्याचे पहावयास मिळाले. आता निवडणूक संपल्यानंतर पुन्हा एकदा दोन्ही नेत्यांमध्ये शाब्दिक चकमक सुरू झाली आहे.



ठाकरे गटाचे मुखपत्र असलेल्या दै. सामनातील एका लेखावरून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी कार्यकारी संपादक असलेल्या संजय राऊतांना प्रत्युत्तर दिले आहे. ७० वर्षांत भारताने लोकशाहीचा साफ कचरा केल्याचे राऊतांनी म्हटले आहे. यावरूनच पटोले यांनी राऊत यांच्यावर सडकून टीका केली आहे.

तुम्ही १०० टक्के राजकारण करीत असाल, तर आम्ही २० टक्के राजकारण आणि ८० समाजकारण करतो. संजय राऊत ज्या शाळेत शिकले ती काँग्रेसने निर्माण केली होती. त्यांच्या गावात पाणी, दवाखाना, त्यांचे बाळंतपण जिथे झाले ते काँग्रेसने निर्माण केले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान टिकवण्याचे कामही काँग्रेसने केले आहे. त्यामुळे मी त्यांच्यावर काय प्रतिक्रिया देणार. संजय राऊत अतिविद्वान आहेत आणि कालच ते लंडनहून आलेले आहेत. त्यामुळे तिथून ते काय जास्त शिकून आलेत ते मला माहिती नाही, असा टोला नाना पटोले यांनी लगावला आहे.

## मान्सून कर्नाटकात

**बंगळुरू :** केरळमध्ये दाखल झालेला मान्सून तामिळनाडूमधून पुढे सरकरला असून आता कर्नाटकात धडकला आहे. दोन दिवस या भागात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

दुसरीकडे मुंबईसह महाराष्ट्राला मान्सूनची प्रतिक्षा आहे. महाराष्ट्रात पुढील आठवड्यात मान्सून दाखल होण्याची शक्यता आहे. एकीकडे दक्षिणेकडे मान्सून पोहचला असताना आयएमडीने दिल्लीसह उत्तर भारतात उष्णतेच्या तीव्र लाटेचा इशारा दिला आहे.

## निवडक

### केजरीवालांचे आत्मसमर्पण; ५ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी

**नवी दिल्ली :** मद्य धोरण गैरव्यवहार प्रकरणात अंतरिम जामिनाची मुदत संपल्यानंतर दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रविवारी (दि. २) तिहार तुरुंगात आत्मसमर्पण केले. त्यांना ईडीने अटक केल्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला होता. तुरुंगामध्ये आत्मसमर्पण केल्यानंतर केजरीवालांना दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू न्यायालयाने ५ जूनपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

### पंढरपूरमध्ये विठूरायाचे चरणस्पर्श दर्शन पुन्हा सुरू

**पंढरपूर :** तब्बल ७९ दिवसानंतर पंढरपूर येथील विठूरायाच्या चरणस्पर्श दर्शनास रविवार (दि. २)पासून सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर आषाढी एकादशीप्रमाणेच पंढरपुरात गर्दी दिसून आली. देवाचे देखणे रूप पाहण्यासाठी शनिवारी रात्री ८ वाजल्यापासूनच हजारो भाविकांनी गर्दी केली होती. सकाळी साधारण ६ वाजल्यापासून भाविकांच्या दर्शनाला सुरुवात झाली.

## इलेक्शन ड्युटीवरील कर्मचाऱ्यांनाही उष्णतेचा फटका

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लोकसभा निवडणुकीसाठी सातव्या अन् अखेरच्या टप्प्यातील मतदान रविवारी म्हणजेच १ जून रोजी पार पडले. मतदान झाल्यानंतर एकीकडे संपूर्ण देशात एक्झिट पोलची चर्चा सुरू होती, तर दुसरीकडे मीडिया रिपोर्ट्सनुसार तीव्र उष्णतेमुळे निवडणूक कर्तव्यावर तैनात असलेल्या ३३ कर्मचाऱ्यांसह किमान ५८ लोकांचा मृत्यू झाला आहे.

**३३ जणांचा मृत्यू**



मिळालेल्या माहितीनुसार सर्वाधिक मृत्यू उत्तर प्रदेशात झाले आहेत. तिथे मिर्झापूर आणि सोनभद्र येथे निवडणूक ड्युटीवर तैनात असलेल्या १५ कर्मचाऱ्यांचा शुक्रवारी उष्माघाताने मृत्यू झाला. मिर्झापूरचे विभागीय आयुक्त मुथुकुमारसामी बी म्हणाले की, त्यापैकी १३ जणांमध्ये सात होमगार्ड, तीन स्वच्छता कर्मचारी आणि एक लिपिक कर्मचारी यांचा समावेश आहे. उत्तर प्रदेशचे मुख्य निवडणूक अधिकारी नवदीप रिनवा यांनी सांगितले की, हे सर्वजण भर उन्हात दिवसभर मतदान प्रक्रियेदरम्यान कर्तव्यावर होते. ड्युटीवर मरण पावलेल्यांना १५ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

बिहारमध्येही निवडणूक ड्युटीवर तैनात असलेल्यांचा मृत्यू झाल्याची बातमी आहे. येथे एका दिवसात १४ लोकांचा मृत्यू झाला.

ओडिशातील आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी सांगितले की, उष्णतेशी संबंधित आजारामुळे आणखी नऊ जणांचा मृत्यू झाला आहे. यामुळे आता मृत्यू झालेल्यांची एकूण संख्या ५४ झाली आहे. ओडिशात शुक्रवारी उष्माघाताने मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ४५ होती. ५४ मृत्यूंपैकी २० पश्चिम ओडिशाच्या बोलंगीर जिल्ह्यात आणि १५ संबलपूरमध्ये झाले.

मध्य प्रदेशातदेखील उष्णतेच्या लाटेमुळे दोन मृत्यूची नोंद झाली आहे.

## मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपीचा कारागृहात खून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

१९९३च्या मुंबई बॉम्बस्फोटप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगणाऱ्या मुन्ना उर्फ मोहम्मद अलीखान उर्फ मनोजकुमार भवरलाल गुप्ता (वय ७०) याचा कळंबा कारागृहात खून झाल्याची घटना रविवारी (दि. २) घडली. कारागृहातील पाच न्यायालयीन बंदींनी ड्रेनेजच्या लोखंडी झाकणाने खून केला असल्याचे सांगण्यात येते.

मुन्ना उर्फ मोहम्मद अली खान उर्फ मनोज कुमार भवरलाल गुप्ता हा रविवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास कारागृहातील हौदावर अंघोळीला गेला होता. या वेळी कारागृहातील इतर कैद्यांसोबत त्याचा वाद झाला. हा वाद विकोपाला गेला. त्यातून कैद्यांमध्ये हाणामारी सुरू झाली. त्या वेळी कैद्यांच्या एका गटाने मुन्ना उर्फ मोहम्मद अली खान उर्फ मनोज कुमार भवरलाल गुप्ता याच्यावर हल्ला चढवला. त्याला ड्रेनेजच्या लोखंडी झाकणाने मारहाण केली. या मारहाणीत त्याचा मृत्यू झाला.

न्यायालयीन बंदी आरोपी प्रतीक उर्फ पिल्या सुरेश पाटील, दीपक नेताजी खोत, सौरभ विकास सिद्ध, संदीप शंकर चव्हाण, ऋतुराज विनायक इनामदार अशी हल्लेखोरांची नावे आहेत.

## रक्ताचे नमुने बदलल्याप्रकरणी मुलाच्या आई-वडिलांना कोठडी

**पुणे : प्रतिनिधी**

कल्याणीनगर अपघात प्रकरणात अल्पवयीन मुलाला वाचविण्यासाठी त्याच्या रक्ताचा नमुना बदलून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल आणि त्याची पत्नी शिवानी यांना रविवारी (दि. २) विशेष न्यायालयाने ५ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.



पुणे हिट ॲण्ड रन प्रकरण

अल्पवयीन आरोपीची आई शिवानी अग्रवालने मुलाच्या ऐवजी स्वतःचे रक्त तपासणीसाठी दिल्याचे, तर अल्पवयीन आरोपीचे वडील विशाल अग्रवाल यांनी या प्रकरणात मदत केल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी शिवानी व सुरेंद्र अग्रवाल यांना गुन्हे शाखेने अटक केली होती. त्यानंतर अग्रवाल दाम्पत्याला रविवारी दुपारी सुटीच्या न्यायालयात हजर करण्यात आले. या प्रकरणाचा सखोल तपास करायचा असल्याने पोलीस कोठडी देण्याची विनंती सरकारी वकिलांनी केली. त्यानुसार न्यायालयाने अग्रवाल दाम्पत्याला ५ जूनपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

दरम्यान, विशाल अग्रवाल आणि पबमालकांनी जामीन मिळवण्यासाठी न्यायालयात अर्ज सादर केला होता. याबाबत पोलिसांनी त्यांचे म्हणणे शनिवारी सादर केले आहे. आरोपींच्या अर्जावर ५ जून रोजी सुनावणी होणार आहे.

## कर्जत चारफाट्याने घेतला मोकळा श्वास

### लवकरच होणार सुशोभीकरण

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे मुख्य प्रवेशद्वार असलेल्या चारफाट्यावर मोठ मोठे होर्डिंग उभारून विद्रुपीकरण करण्यात आले होते. अखेर हे विद्रुपीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाने भुईसपाट केल्याने चारफाट्याने मोकळा श्वास घेत आहे. या भागात सुशोभीकरण करण्यात येत असून वाहतूक समस्याही मार्गी लागणार आहे.



गेल्या अनेक वर्षांपासून चारफाटा अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेला होता. चारही बाजूला अतिक्रमण करून अनधिकृत उभारलेले गाळे आणि त्यात छोटे-मोठे होर्डिंग उभारण्यात आले होते. त्यामुळे मुंबई, पुण्यावरून येणाऱ्या पर्यटकांना कर्जतचे प्रवेशद्वार विद्रुप दिसून येत होते. दोन वर्षांपूर्वी पोलीस बंदोबस्तात येथील अतिक्रमण हटविण्यात आले. यानंतर प्रश्न होता तो बॅनर आणि टोलेजंग होर्डिंगचा. अनेक वेळा सार्वजनिक बांधकाम विभागाने अनधिकृत उभारलेल्या बॅनरधारकांना नोटीस बजावली होती. तरीही ते हटवले जात नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजीव वानखेडे, अभियंता अक्षय चौधरी यांनी पोलीस बंदोबस्त घेऊन संपूर्ण होर्डिंग, बॅनर जेसीबीच्या सहाय्याने हटविण्यात आले. त्याचप्रमाणे नव्याने बांधण्यात आलेले गाळे काढण्यात आले आहे. यामुळे चारफाटा मोकळा दिसत आहे. आता येथे संत आणि हुतात्मे यांचे पुतळे उभारण्यात येऊन गार्डन साकारण्यात येणार आहे.

## जम्बो ब्लॉकनंतर सीएसएमटीपर्यंत लोकलसेवा पूर्ववत

**मुंबई : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसवरील (सीएसएमटी) ३६ तासांचा ब्लॉक संपला असून सीएसएमटी येथे बंद असलेली लोकलसेवा सुरू झाली आहे. ब्लॉक कालावधीत हार्बर मार्गावरील लोकल वडाळ्यापर्यंत, तर मुख्य मार्गावरील लोकल दादर, परळ आणि भायखळ्यापर्यंत धावत होत्या. त्यामुळे शनिवारी संपूर्ण दिवस मुंबईकरांची तारांबळ झाली. अखेर रविवारी (दि. २) दुपारी १ वाजण्याच्या सुमारास सीएसएमटीवरून लोकलसेवा चालू झाल्याने प्रवाशांची रेलचेल सुरू झाली.



सीएसएमटी येथे फलाट क्रमांक १०-११चा विस्तार करण्यासाठी शुक्रवारी मध्यरात्री १२.३० वाजल्यापासून ब्लॉक सुरू झाला. या ब्लॉकचे पडसाद शनिवारी दिसले तसेच रविवारी दुपारी १२.३० वाजेपर्यंत ब्लॉक नियोजित होता. त्यामुळे रविवारी सकाळी घराबाहेर पडलेल्या प्रवाशांना आणि पर्यटकांना भायखळा, वडाळ्यावरून बेस्ट बस, रिक्षा-टॅक्सीचा आधार घ्यावा लागला. रविवारी २३५ लोकलच्या फेऱ्या रद्द केल्याने दोन लोकलमधील वेळेचे अंतर जास्त होते. लोकल विलंबामुळे मुख्य आणि हार्बर मार्गावरील महत्त्वाच्या स्थानकात प्रवाशांची गर्दी झाली. प्रवासी बराचवेळ स्थानकात उभे राहून लोकलची वाट बघत होते. लोकल मिळाली तरी सकाळी भायखळा आणि वडाळ्यापर्यंत लोकल येत असल्याने प्रवाशांना पुन्हा बेस्टने प्रवास करावा लागला. मिलुंड, भांडूप, विक्रोळी, कांजूरमार्ग, घाटकोपर, कुर्ला, शीव, माटुंगा, दादर, भायखळा या परिसरात प्रवाशांची गर्दी होती. रविवारी दुपारी १२.३० वाजण्यादरम्यान सीएसएमटी येथील ब्लॉकचा कालावधी संपला. त्यानंतर रेल्वे प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास टाकला.

### विस्तारित फलाट मार्गावरून चालवले नवीन इंजिन

तब्बल ३६ तासांनी सीएसएसटीवरून लोकलसेवा सुरू झाली. यासह नव्याने विस्तार केलेल्या फलाट क्रमांक १०-११च्या मार्गावरून नवीन इंजिन चालविण्यात आले.

**मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील फलाट क्रमांक १०-११चे २४ डब्यांच्या विस्ताराचे काम पूर्ण केले आहे. त्याचा फायदा लोकल व लांब पल्ल्याच्या प्रवाशांना होईल. यासाठी पाठिंबा देणाऱ्या मुंबईकरांचे कौतुक करतो.**

**-राम यादव,**
**महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे**

## निवडक

### साहिल पवार दहावीत प्रथम



**मोहोपाडा :** येथील जनता विद्यालय शाळेतून इयत्ता दहावीच्या परिक्षेत ८१.२० टक्के गुण प्राप्त करून साहिल पवार याने दहावीत प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. साहिल पवार याला लहानपासूनच अभ्यासाची आवड आहे. वडील संदीप पवार, आई दिपिका पवार यांच्यासह शाळेतील शिक्षकांच्या आपल्या यशात मोठा वाटा असल्याचे साहिलने सांगितले. साहिलने मोहोपाडा जनता विद्यालयातून प्रथम क्रमांक पटकाविल्या बद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### पनवेलमध्ये रोप लागवड, सायकलवाटप



**पनवेल :** माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला यांच्या वाढदिवसानिमित्ताने रविवारी (दि. २) पनवेल येथे रोप लागवड करण्यात आली तसेच जांभिवलीवाडी येथील दोन विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला यांच्यातर्फे सईद मुल्ला यांच्या वाढदिवसानिमित्ताने जांभिवलीवाडी येथील दोन विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. या वेळी रोप लागवडदेखील करण्यात आली. या वेळी माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, डॉ. ययाती गांधी, त्यांचे मित्र परिवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

### 'पीईएस'चे दहावी, बारावीत सुयश

**पनवेल :** पनवेल एज्युकेशन सोसायटी (पीईएस)चा यंदाचा दहावी व बाराचा निकाल १०० टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे सोसायटीचे अध्यक्ष इक्बाल हुसेन काझी यांनी अभिनंदन केले आहे. यंदाच्या वर्षी पनवेल एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत असलेल्या पी.ई.एस. इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज पनवेलचा बारावीचा निकाल १०० टक्के लागला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग यांनी अभिनंदन केले आहे.

### अजिज शेख यांचा विशेष सत्कार

**पनेवल :** शहरी प्रशासकीय सेवेतील अजिज शेख यांची भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल विशेष सत्कार महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा अधिकारी संघटनेमार्फत करण्यात आला. महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा अधिकारी संघटनेमार्फत अध्यक्ष गणेश देशमुख, सचिव डॉ. प्रशांत रसाळ, कोषाध्यक्ष जमीर लेंगरेकर व वरिष्ठ सदस्य तथा माजी आयुक्त सुधाकर देशमुख, देविदास टेकाळे, विजयकुमार म्हसाळ, प्रशांत रोडे, तृप्ती सांडभोर, मंगेश चितळे, अश्विनी वाघमळे, भालचंद्र बेहरे, व इतर उपस्थित सदस्य यांच्या वतीने शहरी प्रशासकीय सेवेतील अजिज शेख यांचा भारतीय प्रशासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.



# उद्धव ठाकरेंचे एनडीएत येण्यासाठी प्रयत्न

## मंत्री दीपक केसरकर यांचा दावा



**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून उद्धव ठाकरे यांच्याकडून पंतप्रधान मोदी यांना भेटण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. उद्धव ठाकरे यांना राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात एनडीएमध्ये यायचे आहे. त्यासाठी उद्धव ठाकरे हे विविध लोकांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापर्यंत मेसेज पाठवत आहेत, असा खळबळजनक दावा शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी रविवारी केला.

या वेळी दीपक केसरकर यांनी लोकसभा निवडणुकीच्या निकालासंदर्भात भाष्य केले. महाराष्ट्रात निघालेले फतवे व उशीरा जाहीर झालेल्या जागांमुळे आम्हाला नुकसान झाल्याची कबुली दीपक केसरकर यांनी दिली, मात्र आम्ही आता विधानसभेला जास्त काळजी घेऊ. आम्हाला विधानसभा निवडणुकीत अपेक्षित जागा मिळतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. या वेळी त्यांनी उद्धव ठाकरे यांच्याबाबत एक सनसनाटी दावा केला. उद्धव ठाकरे यांना एनडीएमध्ये यायचे आहे.

त्यासाठी ते विविध लोकांच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेण्यासाठी मेसेज पाठवत आहेत, असे केसरकर यांनी सांगितले.

### *आमदार रवी राणा यांचेही मोठे वक्तव्य*

***अपक्ष आमदार रवी राणा यांनी मोठे विधान केले आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान म्हणून विराजमान झाल्यानंतर १५ दिवसांमध्ये उद्धव ठाकरे हे मोदी सरकारमध्ये असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर ते दिसतील. कारण येणारा काळ हा नरेंद्र मोदी यांचा आहे. देशाचे भविष्य उज्वल करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची गरज आहे, असे रवी राणा यांनी म्हटले आहे.***

## एसटी बसमधून दागिने चोरीस

**खोपोली : प्रतिनिधी**

एसटी महामंडळाच्या वाई-मुंबई या बसमधून सुरेखा संजय करंडे (मुंडवा, पुणे) या स्वारगेट पनवेल असा प्रवास करीत असताना, फूडमॉल हॉटेलसाठी थांबले असताना सुरेखा यांच्या पर्समधील डबीतून एक लाख ५१ हजार रुपयांचे दागिने लंपास झाल्याची घटना घडली याबाबत सुरेखा यांनी खोपोली पोलिसात तक्रार दिली आहे.




एसटी महामंडळाच्या बस (एचएच १४ बीटी ४३२४) या वाई मुंबई बसमधून सुरेखा करंडे प्रवास करीत होत्या. खोपोली फूड मॉल हॉटेलला बस थांबली असता सुरेखा करंडे यांनी आपल्या पर्समधील डबी तपासली असता त्यातले दागिने चोरीस केल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांना खात्री पटली की लोणावळा येथे दोन इसम उतरले त्यांनीच ती चोरी केलेली असावी असा संशय त्यांनी पोलिसांजवळ व्यक्त केला.

या संदर्भात खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर १६९/२०२४. भादवी ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक शितलकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक आलोक किस्मतराव पुढील तपास करीत आहे.

## सलमान खानवरील हल्ल्याच्या कटप्रकरणी आणखी एकाला अटक

**पनवेल : वार्ताहर**



बॉलीवूड अभिनेता सलमान खान याला जीवे मारण्याची धमकी देणारे लॉरेन्स बिष्णोई व गोल्डी ब्रार गँगमधील आरोपींच्या एका साथीदाराला पनवेल शहर पोलिसांनी हरियाणा येथून अटक केली आहे.

दीपक हवासिंग गोगालिया जॉनी वाल्मिकी (वय ३० रा. ग्राम तिग्रणा ठाणा, भिवानी, हरीयाणा) असे या आरोपीचे नाव आहे. या आरोपीने बाहेरून येणाऱ्या आरोपींची राहण्याची व गुन्हा करण्यासाठी वापरणार असलेल्या वाहनांची व्यवस्था करणार असलेबाबत सहभाग घेतला होता. तो व्हिडीओ कॉलद्वारे कटातील आरोपींच्या संपर्कात होता. पोलीस उपायूक्त विवेक पानसरे यांनी भिवानी पोलीस अधिक्षक वरूण सिंघला यांनी माहिती कळविली असता त्यांनी भिवानी क्राईम ब्रँचचे पोलीस निरीक्षक रवींद्र व त्यांच्या पथकाला नेमून जॉनी वाल्मिकी यास ताब्यात घेतले.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विनोद लभडे यांनी आरोपी जॉनी वाल्मिकीला भिवानी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने ५ जून २०२४पर्यंत ट्रांझिट कस्टडी रिमांड मंजूर केला आहे. नवी मुंबई पोलिसांचे पथक आरोपीला घेऊन पनवेल येथे `परत येत आहेत.

## मतमोजणी केंद्राची निरीक्षकांकडून पाहणी आणि तयारीचा आढावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**



लोकसभा सार्वत्रिक निवडणूक करीता ३२ रायगड लोकसभा मतदारसंघाची मतमोजणी मंगळवार, ४ जून रोजी सकाळी ८ वाजेपासून जिल्हा क्रीडा संकुल, नेहूली अलिबाग येथे पार पडणार आहे. मतमोजणीची सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून आज रविवार (दि.२) रोजी मतमोजणी निरीक्षक संजीव कुमार झा यांनी मतमोजणी केंद्राची पाहणी करून तयारीचा आढावा घेतला.

या वेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे, कार्यकारी अभियंता जगदीश सुखदेवे, पोलीस उपविभागीय अधिकारी विनीत चौधरी यांसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. या वेळी मतमोजणीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेले विविध कक्ष, मतमोजणी कक्षाची विधानसभा निहाय रचना, बैठक व्यवस्थापन, निवडणूक अधिकारी कर्मचारी, मत मोजणी प्रतिनिधी आणि उमेदवार यांच्यासाठी देण्यात येणाऱ्या सुविधा, आपत्कालीन यंत्रणा, वैद्यकीय कक्ष, अत्यवश्यक सोयीसुविधांची उभारणी, उमेदवारांसाठी व्यवस्था, माध्यम प्रतिनिधींसाठी माध्यम कक्ष या सर्व तयारीची पाहणी केली. तसेच आढावा घेतला.

या वेळी वाहनतळांची जागा निश्चिती, ध्वनीक्षेपक यंत्रणा, वाहतूक वळविणे आदी अनुषंगाने चर्चा करण्यात आली. मतमोजणीचया अनुषंगाने विविध घटकांना कोणताही त्रास होणार नाही तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही यादृष्टीने सर्व ती खबरदारी घेण्याच्या सूचना श्री झा यांनी दिल्या.

या वेळी श्री झा यांनी जिल्हा प्रशासनाने निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतमोजणीसाठी केलेली तयारी व सुविधांबाबत समाधान व्यक्त केले.

## जागतिक तंबाखूविरोधी दिनानिमित्त पनवेल एसटी डेपो येथे जनजागृती रॅली

**पनवेल :** सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागाने राष्ट्रीय सेवा योजना युनिट आणि तंबाखू सेसेशन सेंटर, एमजीएम डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटल, कामोठे, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आज पनवेल एसटी डेपो येथे जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमित्त जनजागृती रॅली काढली.

पनवेल एसटी डेपो येथील जनजागृती रॅली एमजीएम दंत महाविद्यालयाच्या सार्वजनिक आरोग्य दंतचिकित्सा विभागाचे एचओडी डॉ. वैभव ठक्कर यांच्या सक्षम नेतृत्वाखाली काढण्यात आली. संस्थेतील प्राध्यापक सदस्य आणि इंटर्न यांनी तंबाखू सेवनाचे धोके दर्शविणारे फलक आणि पोस्टर्स हातात घेतले होते. त्यांनी प्रवासी तसेच राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना तंबाखू सेवनापासून दूर राहण्यासाठी आणि रॅलीदरम्यान विविध घोषणा देऊन निरोगी जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रवृत्त केले. एमजीएम डेंटल कॉलेजच्या टीमने प्रवाशांना आरोग्य शिक्षण पत्रिकांचे वाटप केले आणि जे लोक तंबाखू सोडण्यास इच्छुक आहेत त्यांना एमजीएम दंत महाविद्यालयातील तंबाखू व्यसनमुक्ती केंद्र पाठवण्यास प्रोत्साहित केले. तंबाखू व्यसनमुक्ती केंद्रातील सेवा तज्ञांकडून मोफत दिल्या जातात.

रॅलीमध्ये उपस्थित प्राध्यापकांमध्ये डॉ. रोहित गड्डा, डॉ. मुनिथा नाईक, डॉ. स्वाती सिंग, डॉ. काश्मिरा कदम आणि समुपदेशक प्रियांका शर्मा यांचा समावेश होता. हा संपूर्ण कार्यक्रम डॉ. श्रीवल्ली नटराजन, डीन, एमजीएम डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटल, कामोठे, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. या कार्यक्रमाला प्रवाशांचा तसेच पनवेल बस डेपोतील राज्य परिवहनच्या कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला. पनवेल बस डेपोचे आगार व्यवस्थापक ज्ञानेश्वर म्हात्रे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा जनजागृती कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी एमजीएम डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटलच्या टीमला पूर्ण सहकार्य केले.




## मिठेखार येथे दुर्गामाता उत्सव उत्साहात साजरा



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील मिठेखार येथे दुर्गामाता उत्सव शुक्रवारी उत्साहात झाला. दुर्गामाता मंडळ मिठेखार व ग्रामस्थ व महिला मंडळ मिठेखार यांनी उत्सवाचे व्यवस्थापन व निमत्रंण केले होते. अलिबाग-मुरूडचे आमदार महेंद्र दळवी यांनी दुर्गामाता मंदिरात भाविकतेने भेट देऊन दर्शनाचा लाभ घेतला.

या वेळी त्याचे समवेत सि.एम.ठाकूर, आशिष भट, ॲड मनमित पाटील आदीची उपस्थिती होती. मिठेखार ग्रामस्थांनी आमदार महेंद्रशेठ दळवी यांचे यथोचीत स्वागत सत्कार ज्येष्ठ कार्यकर्ते व दुर्गामाता भक्त मोहन ठाकूर यांनी केले. या वेळी मोहन ठाकूर, रमेश गायकर, योगेश पाटील, प्रमोद पाटील, सचिन पाटील, यशवंत पाटील,राकेश गायकर, रातिश गायकर, परेश ठाकूर, दिलिप गायकर, वसंत तांबडे, हरिष ठाकूर, अमोल रोटकर आदी मिठेखार ग्रामस्थ व महिला मंडळ मिठेखार यांची उपस्थिती होती.

## रायगडचा महिला क्रिकेट संघ छत्रपती संभाजीनगरला रवाना

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन आयोजित एकदिवस महिला क्रिकेट स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्याचा महिला क्रिकेट संघ रविवारी (दि. २) संभाजीनगरला रवाना झाला. संघाच्या कर्णधारपदीची धुरा समिधा तांडेल हिच्याकडे सोपविण्यात आली आहे.

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे नवनिर्वाचित अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी रायगडाच्या महिला संघाला शुभेच्छा दिल्या. भविष्यात रायगड जिल्ह्यात मुलींच्या क्रिकेटसाठी नियोजनबद्ध आखणी करून भरपूर स्पर्धा आणि कॅम्पचे आयोजन जिल्हा क्रिकेट असोसिएशन करणार असल्याचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.

रायगडाचा संघ : समिधा तांडेल (कर्णधार), समृद्धी कांबळे, अपर्णा गायकवाड, आमिषा बामणे, श्रुती देसाई, शुभांगी दास, अंजली गोडसे, अनुष्का वर्मा, प्रांजल चिपळूणकर, रुचिता नाचणकर, काजल साळुंके, श्रुती आदीत, श्रुष्ठी भोईर, वेदश्री शेळके, प्रशिक्षक विनय पाटील, व्यवस्थापक शाम पाटील.

पान १ वरून

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा

माजी नगरसेवक अमर पाटील, निलेश बाविस्कर, हरेश केणी, बबन मुकादम, मनोहर म्हात्रे, डॉ. अरुणकुमार भगत, ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, समीर ठाकूर, विजय चिपळेकर, विकास घरत, डॉ. अरुणकुमार भगत, तेजस कांडपिळे, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, वृषाली वाघमारे, रूचिता लोंढे, कुसुम म्हात्रे, जयंत पगडे, भूपेंद्र पाटील, दशरथ म्हात्रे, आनंद ढवळे, प्रकाश बिनेदार, कृष्णाशेठ ठाकूर, अरुण घरत, ब्रिजेश पटेल, प्रल्हाद केणी, अनेश ढवळे, कामगार नेते जितेंद्र घरत, अमित जाधव, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, हॅप्पी सिंग, सुमित झुंझारराव, हर्षवर्धन पाटील, विद्या तामखडे, मंगेश शेलार, प्रदीप भगत, प्रकाश पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवरांनी व हितचिंतकांनी शुभेच्छा दिल्या. दरम्यान, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे फोनवरूनही अनेक नेते आणि मान्यवरांनी अभीष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या.

## वडाळे तलावाचा वीजपुरवठा पूर्ववत

**पनवेल :** वडाळे तलाव परिसरात शनिवारी (दि. १) वीजपुरवठा खंडित झाला होता. शिवसेनेचे स्थानिक नेते व सामाजिक कार्यकर्ते चंद्रशेखर सोमण यांच्या लक्षात नागरिकांनी ही गोष्ट आणून दिल्यावर महापालिकेचे विद्युतपुरवठा अधिकारी व सल्लागार बि. आर. कदम यांना फोन करून या घटनेची माहिती दिली व त्यांनी त्वरित या घटनेला वडाळे तलाव जवळील ट्रान्सफरमरचा 'डी.ओ' खराब झाल्याने ही समस्या उद्भवली, असे सांगितले.


सोमण यांनी लागलीच त्वरित महावितरणच्या अधिकाऱ्यांना संपर्क केला असता सहाय्यक अभियंता किशोर पाटील हे त्वरित आपला लाईनमनच्या स्टाफसह जागेवर उपस्थित झाले.

उपस्थित महावितरणचे कर्मचारी श्री सानप, श्री राठोड व श्री मते यांनी युद्धपातळीवर कामाला सुरुवात करत दीड तासाच्या अथक परिश्रमानंतर नवीन डी.ओ ट्रान्सफॉर्मरमध्ये बसवून वडाळे तलाव व आसपास परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत केला. यावेळेस सोमण यांनी स्वतः कर्मचाऱ्यांसोबत उभे राहून महापालिका व महावितरण यांच्यात यशस्वी समन्वय साधला व झालेल्या घटनेची गंभीर दखल घेत स्वतःच्या उपस्थितीत रात्री नऊ वाजता हा विद्युतपुरवठा पूर्ववत करून दिला.



## कळंबोली येथे गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**



भाजपचे माजी केंद्रीय मंत्री स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी (दि. ३) कळंबोली सेक्टर ४ येथील श्री स्वामी समर्थ मंदिर येथे सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन केलेले आहे. या शिबिराचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर करणार आहेत.

सकाळी दहा ते दुपारी तीन वाजेपर्यंत रक्तदान शिबिर चार वाजता भजन व संध्याकाळी सात ते नऊ या कालावधीमध्ये समाज प्रबोधनकार हभप किशोर महाराज खाडे बीड यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. या कार्यक्रमासाठी आमदार प्रशांत ठाकूर, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य बाळासाहेब पाटील, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील माजी नगरसेवक अमर पाटील, बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, मोनिका महानवर, कमल कोठारी, संदीप म्हात्रे तसेच युवा मोर्चाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून रक्तदान करावे, हीच मुंडेसाहेबांना आदरांजली असेल, असे आवाहन भाजप भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे नियोजन जय भगवान ब्रिगेड यांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केलेले आहे.

### दुखवटा

## शांताबाई गडकरी

**धाटाव :** रोह्यातील विद्यार्थीप्रिय निवृत्त प्राथमिक शिक्षिका शांताबाई गडकरी यांचे (वय ९४) शनिवारी (दि. १) निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. पत्रकार, लेखक, कवी श्रीनिवास गडकरी यांच्या त्या मातोश्री होत. इंदापूरचे उद्योजक दत्ता व बाळशेठ कूळकर्णी यांच्या भगिनी आणि स्वतंत्रसैनिक स्व. भाई गडकरी यांच्या त्या पत्नी होत्या. शिक्षक वर्गात त्या प्रचंड लोकप्रिय होत्या. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच अनेक मान्यवरांनी या वेळी गडकरी कटुंबियांचे सांत्वन केले.



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम

# रक्तदान शिबिरांना प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त उत्कर्ष सांस्कृतिक कला आणि क्रीडा मंडळ आणि आम्ही रक्तदाते पनवेलचे या संस्थांच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयात रविवारी (दि. २) करण्यात आले होते.

या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट देऊन उत्कृष्ट आयोजनाचे कौतुक केले तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांनी रक्तदान करून या शिबिरात सहभाग घेतला. दरम्यान, रक्तदान केलेल्या रक्तदात्यांचे उपस्थित मान्यवरांनी प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान केला.

या शिबिराचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक तथा पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांच्या हस्ते झाले. या शिबिराला नागरीकांचा चांगला प्रतिसाद लाभला. या शिबिरासाठी खारघरमधील टाटा मेमोरियल सेंटरचे सहकार्य लाभले.

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त प्रदीपशेठ भगत युवा मंच कामोठे यांच्या वतीने रविवारी मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या वेळी या शिबिराला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत रक्तदात्यांना प्रोत्साहित केले.

या वेळी पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विजय चिपळेकर, विकास घरत, विद्या तामखडे, प्रभाग समिती सभापती अरुणाताई भगत, स्वाती केंद्रे, कामोठे युवा शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, तेजस जाधव, आदित्य भगत, सुयोग वाफारे, भटके-विमुक्त आघाडी संयोजक बबन बारगजे यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.





पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना वाढदिवसानिमित्त भाजपच्या अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष तथा मावळ लोकसभा मतदारसंघाचे संयोजक सय्यद अकबर व सहकाऱ्यांनी सांगलीतील मिरज येथील खास कलावंतांकडून बनवून आणलेली वीणा भेट दिली. विद्येची देवता असलेल्या सरस्वतीला प्रिय असणारी वीणा तसेच पगडी घालून त्यांचा सन्मान करण्यात आला. या वेळी साबीर शेख, ॲड. मेहबूब पटेल, नविद पटेल आदी उपस्थित होते.




कामोठे : येथील सुषमा पाटील विद्यालयात दिंडोरीप्रणित स्वयंरोजगार विभाग आणि प्रगती फाऊंडेशन रजि. (मुंबई) आयोजित मोफत भव्य महारोजगार मेळावा व मार्गदर्शन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले. या वेळी माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, भाजप कामोठे शहर सरचिटणीस हर्षवर्धन पाटील आदी उपस्थित होते.



खारघर : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त सेक्टर २१मधील आचार्य अत्रे गार्डनमध्ये रविवारी सिनर्जी अकॅडमीचे शुभ पाटील यांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजप जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, शुभ पाटील, सरचिटणीस दीपक शिंदे, दीपक ठाकूर, निघोट काका, वैभव पाटील, यश म्हात्रे, विनय राठोड, निरज फडके, निरू अरोरा, अभिषेक अरोरा, अदिती अरोरा, राहूल अरोरा, रूची अरोरा आणि सिनर्जी अकॅडमीचे विद्यार्थी, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : तालुक्यातील शिरवली येथील भाजपचे कार्यकर्ता भालचंद्र सिनारे यांची कन्या आकांक्षा हिच्या विवाहानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी सरपंच तुकाराम पाटील, रवींद्र पाटील, पांडुरंग पाटील, भालचंद्र सिनारे आदी उपस्थित होते.

## खारघरमध्ये दहावी आणि बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा



**खारघर : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या औचित्य साधून प्रवीण स्पोर्ट्स असोसिएशन, खारघरच्या वतीने व पनवेल महापालिका माजी सभापती प्रवीण पाटील यांच्या पुढाकाराने खारघर शहरातील दहावी व बारावीच्या उत्तीर्ण झालेल्या ४६ विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा भाजप जनसंपर्क कार्यालय, खारघर येथे आयोजित करण्यात आला.

या वेळी खारघर शहर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना भविष्यात उच्च शिक्षण पूर्ण झाल्यानंतर नवी मुंबईत रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होणार असल्याचे सूचित केले. खारघर शहर अध्यश प्रवीण पाटील यांनी दहावी, बारावीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून प्रशस्तीपत्र व भेटवस्तू दिल्या. उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी यशस्वी विध्यार्थ्यांचे कौतुक करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदान याबद्दल उपास्थितांना माहिती दिली.

या वेळी जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, कर्जत अध्यक्ष राजेश भगत, मनोहर मुंबईकर, अशोक ओसवाल, सरचिटणीस दीपक शिंदे जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, कीर्ती नवघरे, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, अमर उपाध्याय, युवा उपाध्यक्ष प्रवीण बेरा, युवा जिल्हा सचिव शुभ पाटील, किसन मोर्चा जिल्हाध्यक्ष अतुल बडगुजर, किरण पाटील, दिलीप जाधव, महेश भोईर, विशाल नाईक, प्रीतम करावकर, महेश भगत, नितेश राम पाटील, जयदीप गिरासे, राहुल बेरा, अश्विनी भुवड, भागवत गायकवाड, संजय साखरे, अनिल खोपडे, तुकाराम कंटाळे, दीपक ठाकूर इत्यादी भाजप कार्यकर्ते, पदाधिकारी व विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## कळंबोलीत शोरूमचा शुभारंभ

### आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

**पनवेल :** आमदार प्रशांत ठाकूर तसेच विनोदी मालिकेच्या माध्यमातून घराघरात पोहचलेला अभिनेता दिलीप जोशी अर्थात जेठालाल यांच्या उपस्थितीत कळंबोली व्ही.एन.इलेक्ट्रॉनिक्स शोरुमचा शुभारंभ करण्यात आला.

या उद्घाटन सोहळ्यास अभिनेता दिलीप जोशी, उद्योजक विजय कक्कड, व्ही. एन. इलेक्ट्रॉनिक्सचे संचालक मोहित कक्कड, मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, कामधेनू बिल्डर्सचे सतीश सबलोक, रोनक ॲडव्हर्टाजिंगचे अमरदीप सिंग, पोलीस अधिकारी सतीश गायकवाड, माजी नगरसेवक राजू शर्मा, अमर पाटील, गुरुनाथ गायकर, उद्योजक आदर्श शेट्टी, राकेश गोवारी तसेच उद्योग क्षेत्रातील इतर नामवंत व्यक्ती या वेळी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर उद्घाटनावेळी शुभेच्छा देताना सांगितले की, या शोरूमचा विस्तार फक्त कळंबोली परिसरात न होता मुंबई, नवी मुंबई परिसरातसुद्धा होणे गरजेचे आहे. अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक्स वस्तू एकाच ठिकाणी व वाजवी दरात मिळणार असल्याने ग्राहकांचा फायदा होणार आहे.



पनवेल : वाकडीचे माजी सरपंच तथा ज्येष्ठ नेते नरेश पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, धना पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : भाजप तालुका चिटणीस नवनाथ पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी प्रल्हाद केणी, संतोष पाटील आदी उपस्थित होते.



पनवेल : पडघे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व प्रभाग २चे अध्यक्ष कृष्णाशेठ पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ॲड. पवन व अन्य उपस्थित होते.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल ओरियन मॉल आणि कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण समाजमंडळाच्या वतीने मॉलमध्ये रविवारी (दि. २) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.





या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी रक्तदात्यांचा सन्मान करून सामाजिक भान ठेऊन राबवण्यात आलेल्या या उपक्रमाबद्दल ओरियन मॉल आणि कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण समाजमंडळाचे कौतुक केले. मागील तीन महिन्यांपासून असलेला उन्हाळा तसेच निवडणुकीची आचारसंहिता यामुळे सर्वत्र रक्ताचा तुटवडा निर्माण झाला होता. हे लक्षात घेऊन कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण समाज आणि ओरियन मॉलच्या वतीने रविवारी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला एमजीएम हॉस्पीटलचे सहकार्य लाभले.

या वेळी कुडाळदेशकर आद्य गौड़ ब्राह्मण समाज पनवेल यांचे अध्यक्ष श्री मंगेश परुळेकर, उपाध्यक्ष नंदा नाईक, सचिव यतीन ठाकूर, श्याम वालावलकर, हरेश परुळेकर, अपूर्वा प्रभू, खजिनदार विनायक तिरोडकर, सभासद शाम वालावलकर, चंद्रकांत तेंडुलकर, भाऊ सामंत, भारती खानोलकर, क्रांति ठाकूर, नीशा वालावलकर, राजश्री देसाई, चेतना वालावलकर, सुनेत्रा गव्हाणकर, चिन्मय नाईक, गौरांग नाईक, सृष्टी नाईक आदी उपस्थित होते.

## करंजाडे येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** करंजाडे येथे राहणारी एक विवाहिता घरातून



निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बेपत्ता श्रीवणी दीपक मेहरोलिया (वय २०) हिचा रंग गोरा, नाक सरळ, चेहरा उभट, अंगाने सडपातळ असून अंगात पंजाबी ड्रेस आहे. तिला हिंदी व तेलगु भाषा अवगत आहे. या महिलेबाबत माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार डोईफोडे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



पनवेल : प्रबुद्ध सामाजिक संस्थेच्या वतीने करंजाडेमधील दहावी व बारावी परीक्षेत उतीर्ण झालेल्या विद्यार्थी, विद्यार्थिनींचा सन्मान भारतीय संविधानाची उद्देशिका देऊन करण्यात आला. या वेळी प्रबुद्ध सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

## संपादकीय

# एक्झिट पोलचा अंदाज

सर्वांत मोठी लोकशाही असलेल्या भारतातील लोकसभा निवडणुकीची सातव्या व अंतिम टप्प्यातील मतदानप्रक्रिया शनिवारी झाली आणि त्यानंतर नियोजित वेळेपासून एक्झिट पोल अर्थात मतदानोत्तर चाचण्यांमधून निकालाचा अंदाज बांधला जाऊ लागलो. बहुतांश एक्झिट पोल्सनी एनडीएला कौल दिला आहे.

**विविध एक्झिट पोलनुसार देशात पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचेच सरकार येईल, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) जवळपास ३६०हून अधिक जागांसह पुन्हा सत्तेत येत आहे, तर दुसरीकडे काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीला सुमारे १५० जागा मिळतील, असे अंदाज एक्झिट पोलमध्ये दिसून आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या म्हणजेच सातव्या टप्प्याचे मतदान शनिवारी संपताच विविध संस्था आणि वृत्तवाहिन्यांकडून एक्झिट पोलची आकडेवारी जारी करण्यात आली. या वेळी सर्वच एक्झिट पोलमध्ये भाजपप्रणित रालोआला कमीत कमी ३५० आणि जास्तीत जास्त ३७०हून अधिक जागा मिळण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्याचवेळी काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीची कामगिरी अगदीच यथातथा झाली असून या आघाडीस कमीत कमी १२० ते जास्तीत जास्त १५० जागा मिळतील, असा अंदाज आहे. एबीपी-सी व्होटरच्या एक्झिट पोलच्या अंदाजानुसार देशात पुन्हा एकदा भाजपच्या नेतृत्वातील एनडीएचे सरकार येईल. एक्झिट पोलनुसार एनडीएला ३५३ ते ३८३ जागा मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसप्रणित इंडिया आघाडीला १५२-१८२ जागा मिळतील, तर ४-१२ जागांवर अपक्ष निवडून येतील. एक्सिस माय इंडिया, सीएनएक्स आणि चाणक्याच्या एक्झिट पोलने इंडिया आघाडीचे टेन्शन वाढवले आहे. या एक्झिट पोलनुसार एनडीए फक्त बहुमतच मिळवत नाही, तर घोषणेप्रमाणे ४०० पार जात आहे. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होणार असल्याचे नऊच्या नऊ एग्झिट पोलने दाखवले आहे. राजकीय रणनितीकार, विश्लेषक आणि जन सुराजचे संस्थापक प्रशांत किशोर यांनी यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भाजपला स्वबळावर बहुमत मिळेल, असा दावा अनेकदा केला आहे. एक्झिट पोल हा निवडणूक सर्व्हे असतो. मतदानाच्या दिवशी वृत्तवाहिन्या आणि एक्झिट पोल करणाऱ्या एजन्सी मतदान केंद्रावर उपस्थित असतात. मतदान करून झाल्यावर ते मतदारांना मतदानाविषयी प्रश्न विचारतात. त्यांच्या उत्तराच्या आधारे एक रिपोर्ट तयार केला जातो. मतदारांचे पारडे निवडणुकीत कोणाच्या बाजूने आहे? याचा अंदाज यावरून लावता येतो. एक्झिट पोल सर्व्हेमध्ये केवळ मतदारांना सहभागी करून घेतले जाते. अंतिम टप्प्याच्या मतदानानंतर संध्याकाळी मतदान संपल्यावर अर्ध्या तासानंतर एक्झिट पोल जाहीर केले जाऊ शकतात. २०१९च्या लोकसभा निवडणुकीत बहुतांश एक्झिट पोलने मोदी सरकार पुन्हा सत्तेत येईल असा अंदाज वर्तवला होता, जो खरा ठरला. त्या वेळी भाजपने ३०३ जागांवर विजय मिळवला होता. त्यांच्या एनडीएला एकूण ३५३ जागा मिळाल्या होत्या, तर काँग्रेसला ५३ आणि त्यांच्या सहयोगी पक्षांना ३८ जागेवर विजय मिळाला होता. यंदाही मोदींनाच आपला नेता करण्याचा देशाचा मूड असल्याचे बहुतांश एक्झिट पोलमधून दिसून येते. अर्थातच, निकाल जवळ आला आहे. ४ जून रोजी सकाळी मतमोजणी सुरू होऊन दुपारपर्यंत कल समोर येतील. तेव्हा देशाची सत्ता जनतेने कुणाच्या हाती सोपवली याचे चित्र स्पष्ट होणार आहे. त्याचबरोबर एक्झिट पोलच्या अंदाजाची पडताळणीही होईल.**

# कर्जत तालुका होतोय शिक्षणाची पंढरी

कर्जत तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळांमधून प्राथमिक शिक्षण मिळत होते, मात्र माध्यमिक शिक्षणाची सोय उपलब्ध नसल्याने मोठी पंचाईत होत होती. भाषाप्रभू राम गणेश गडकरीसुद्धा कर्जत शहरातील प्राथमिक शाळेत शिकले, परंतु त्यांच्याकडे त्या वेळी फी भरायला पैसे नव्हते म्हणून त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आल्याची नोंद आजही त्या शाळेत पहायला मिळते. त्या वेळी थोऱ्या-मोठ्यांची मुले मुंबई, पुण्याला जाऊन शिक्षण घेत असत. आता कर्जत म्हणजे बटाटावडा, धबधबे, फार्म हाऊस, रिसॉर्ट याच्याबरोबरच शैक्षणिक सुविधेतदेखील अग्रेसर झाला आहे. अनेक संस्थांनी तालुक्यात उच्च शिक्षणाची दालने उघडून कर्जत 'एज्युकेशन हब' म्हणून ओळखले जाऊ लागले आहे.

दादासाहेब पाध्ये, उकिडवे, नाना कोकजे आदींना शिक्षणाचे महत्त्व पटल्याने त्यांनी १९३५ साली अभिनव ज्ञान मंदिर संस्थेची स्थापना करून तालुक्यात पहिली माध्यमिक शाळा सुरू केली. त्यानंतर काही दानशुरांनी आपल्या जमिनी दिल्यामुळे शाळा उभारणीच्या जागेचा प्रश्न सुटला. संस्था उभारणीसाठी दत्तो वामन पोतदार यांनी अथक प्रयत्न केले. त्यानंतर शाळांचा विस्तार तालुक्यात वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेने गौळवाडी, कडाव, माथेरान येथे शाळा सुरू करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. संस्थेने कर्जत तालुक्याबरोबरच ठाणे जिल्ह्यातील वांगणी येथे शाळा सुरू करून तेथील विद्यार्थ्यांनासुद्धा शिक्षणाची दालने उघडून दिली. काही कारणाने माथेरानमधील शाळा बंद करावी लागली. संस्थेच्या उभारणीसाठी रामभाऊ गडकरी, दामू अण्णा आठवले यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. संस्थेने कर्जत, गौळवाडी आणि वांगणी येथे कनिष्ठ महाविद्यालये सुरू केली व विशेषतः तालुक्यातील मुलींची शिक्षणाची गैरसोय दूर केली तसेच शिशु मंदिर, शारदा मंदिराच्या माध्यमातून चिमुकल्यांच्या शिक्षणाची सोयसुद्धा करून दिली.

आदिवासी ग्रामीण भागात शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून भाऊसाहेब राउत यांनी आदिजन विद्या प्रसारक मंडळ स्थापन करून कशेळे येथे माध्यमिक विद्यालय सुरू केले. त्यानंतर डिकसळ-चिंचवली येथेही माध्यमिक विद्यालय सुरू करून त्या भागातील विद्यार्थ्यांच्या दारात शिक्षण उपलब्ध करून दिले. त्यांचे पुत्र मनोहर राऊत या संस्थेची जबाबदारी अगदी नव्वदीजवळ जात असतानाही सांभाळत होते. त्यांनी या दोन्ही ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालये व शिशुमंदिर शाळा सुरू केली. इंग्रजी माध्यमाचे शिक्षण मिळावे म्हणून ॲड. दत्तात्रय पेठे, डॉ. विजया पेठे, शांतीलाल परमार, रमेश पिंपरे आदींनी कर्जत एज्युकेशन सोसायटी स्थापन करून इंग्रजी माध्यमाचे चांगल्या दर्जाचे शिक्षण उपलब्ध करून दिले. या शाळेचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागत आलेला आहे. ही संस्था या वर्षी पन्नास वर्षांची होत आहे. या संस्थेने कडाव येथेही इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू करून ग्रामीण भागातसुद्धा इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची सोय केली आहे. महिला मंडळ संचालित विद्या विकास मंदिर गेल्या अनेक वर्षांपासून गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहेत. लीलाताई दिवाडकर या अनेक वर्ष महिला मंडळाच्या अध्यक्षपदी होत्या. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने शाळा चालवित आहेत. दहिवली येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे जनता विद्या मंदिर, गौरकामत येथील स्वामी विवेकानंद विद्यालय, खांडपे येथील ज्ञान मकरंद विद्यालय, स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय डोंबे विद्यानिकेतन आदी शाळांमधून विद्यादानाचे काम करीत आहेत. खांडपे येथे सुधाकर घारे यांनी गीता घारे फाउंडेशन संस्था स्थापन इंग्लिश व सेमी इंग्लिश शाळा सुरू करून वासराच्या खोंड्यात इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाचे दरवाजे उघडले आहेत. पोसरी येथेसुद्धा सुंदर इंग्लिश मीडियम स्कूल सुरू केले आहे. गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूल, डॉन बास्को स्कूल, कोकण ज्ञानपीठ, सरस्वती एज्युकेशन सोसायटी, जी.व्ही. आचार्य इन्टिट्यूट, दिलकॅप कॉलेज ॲण्ड इन्टिट्यूट, अँग्लो इस्टर्न मरीटाईम काडमी, युनिव्हर्सल बिझनेस स्कूल आदी संस्थांनीसुद्धा कर्जतमध्ये उच्च शिक्षणाची विविध दालने उघडून दिली आहेत.

**खबरबात**
**विजय मांडे**

माथेरानमध्येसुद्धा सरस्वती विद्यालयाच्या माध्यमातून बाबासाहेब गव्हाणकर यांनी शिक्षणाची व्यवस्था केली आहे. नेरळमध्ये नेरळ विद्या मंदिर, नेरळ कनिष्ठ महाविद्यालय, मातोश्री सुमती टिपणीस महाविद्यालय, विद्या विकास मंदिर, विद्या विकास कनिष्ठ महाविद्यालय, नेरळमधील हाजी लियाकत इंग्लिश मीडियम स्कूल सुरू करण्यात आली आहेत. भरत भगत, रघुनाथ धुळे आदींनीसुद्धा कर्जत तालुक्यात शैक्षणिक व्यवस्थेसाठी योगदान दिले आहे. त्यामुळे तालुक्याच्या ग्रामीण व आदिवासी भागातसुद्धा शिक्षणाची गंगा पोहचली आहे. आता कर्जत तालुका 'शिक्षणाची पंढरी' म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. त्याचे कारण म्हणजे उच्च शिक्षणासाठी अनेक संस्थांनी इंजिनीअरिंग, फार्मसी महाविद्यालये सुरू करून उच्च शिक्षण आपल्या दारी आणले आहे.

कर्जतमध्ये १९७५ सालापर्यंत केवळ अकरावीपर्यंतचे शिक्षण होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने अकरावी शालांत परीक्षा रद्द करून दहावी शालांत परीक्षा सुरू केली, मात्र येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पूर्वीसारखेच कल्याण, मुंबई, पुणे, उल्हासनगर, खोपोली आदी ठिकाणी जावे लागत असे. मुलांचे ठीक होते, परंतु मुलींना शिक्षणासाठी बाहेरगावी पाठविण्याची मानसिकता पालकांची नव्हती. उलट दहावी किंवा अकरावी झाल्यानंतर लगेचच मुलींचे हात पिवळे करण्याकडे पालकांचा कल असायचा त्याला. त्या वेळची परिस्थितीसुद्धा काही अंशी कारणीभूत होती.

राज्याचे उच्चशिक्षणमंत्री असलेल्या अप्पासाहेब धारकरांनी नेमक्या या वेळीच या भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून १९८९ साली कोकण ज्ञानपीठ संस्थेची स्थापना केली आणि पदवीपर्यंतचे शिक्षण कर्जतमध्ये आणले. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेचे शिक्षण सुरू झाल्याने विशेष करून तालुक्यातील मुलींच्या शिक्षणातला अडसर दूर झाला. उरण तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी तेथे कला व वाणिज्य महाविद्यालय सुरू करून शिक्षणाची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अप्पासाहेबांनी एकोणीस वर्षांपूर्वी अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू केले. सहकार नगरच्या गोडाऊन मध्ये सुरू केलेले हे महाविद्यालय आता स्वत:च्या सुमारे पस्तीस एकर जागेमध्ये मोठ्या डौलाने उभे आहे. या महाविद्यालयाचे विद्यार्थी महाविद्यालय सुरू झाल्यापासून दरवर्षी मुंबई विद्यापीठाच्या यादीत अगदी प्रथम तीन क्रमांकामध्ये चमकतात. २००७ साली शिक्षणाची आवश्यकता ओळखून त्यांनी आपल्या दिवंगत मुलाच्या नावाने राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय सुरू केले आणि त्या महाविद्यालयाचे विद्यार्थीसुद्धा मुंबई विद्यापीठाच्या यादीत चमकू लागले आहेत. आता या महाविद्यालयात फार्मसी डिप्लोमा, डिग्री, एम फार्मपर्यंत शिक्षण घेता येते.

खरेतर अप्पासाहेबांच्या या योगदानामुळे कर्जतकरांचा शैक्षणिक विकास झालाच, शिवाय अनेकांना रोजीरोटी मिळाली. अप्पासाहेबांचे सहा वर्षा पूर्वी निधन झाले. त्यानंतर काही घटनांमुळे अनेक कटू प्रसंगांशी संस्थेला सामना करावा लागला, परंतु त्याचा परिणाम महाविद्यालयांवर कधीच झाला नाही. शैक्षणिक कार्य अखंडितपणे सुरू आहे. अप्पासाहेबांनी कर्जतमध्ये उच्च शिक्षणाचा भक्कम पाया रचल्यामुळे कर्जतकर नेहमीच त्यांच्या ऋणात राहतील.

डॉ. नंदकुमार तासगावकर यांनी सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून इंजिनीअरिंग, फार्मसी, एमबीए आदी महाविद्यालये सुरू करून केली. विशेष म्हणजे रायगड हॉस्पिटल सुरू करून वैद्यकीय महाविद्यालयही सुरू केले. त्यांनी कर्जतकरांच्या आरोग्याची काळजीसुद्धा घेतली आहे. काही दिवसांतच वैद्यकीय महाविद्यालय सुरू करून या परिसरातील विद्यार्थ्यांना डॉक्टर बनविण्याच्या प्रयत्नातही ते आहेत. डॉ. तासगावकरांनी आपले पहिले अभियांत्रिकी महाविद्यालय २००३ साली कर्जत तालुक्यातील चांदई गावाच्या परिसरात सुरू केले. त्यानंतर अवघ्या नऊ-दहा वर्षात त्यांनी दहा महाविद्यालये सुरू करून कर्जतकरांना खऱ्या अर्थाने शिक्षणाची सोय करून कर्जतची वाटचाल शिक्षण पंढरीकडे नेऊन कर्जत 'एज्युकेशनल हब' म्हणून ओळखण्यास मोठे योगदान दिले. डॉ. तासगावकरांनी या परिसरात शैक्षणिक संकुल उभारून अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिला. त्यामुळे या परिसरातील ग्रामस्थांची आर्थिक पातळी उंचावत आहे. त्यांनी या परिसरातील डिकसळजवळ वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याचा संकल्प सोडला. त्या वेळी त्यांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले, परंतु त्यांनी त्यातूनही मार्गक्रमण करून रायगड हॉस्पिटल सुरू करून कर्जतकरांचे आरोग्य जपण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले आहे. त्यामुळे कर्जतची शैक्षणिक पातळी आकाशाला गवसणी घालेल यात शंका नाही.

## बदलते तंत्रज्ञान

# हॉटेलच्या रूममधील हिडन कॅमेरा असा शोधून काढा



याआधी घडलेल्या एमएमएस लीक संबंधित प्रकरणांमुळे तुम्हालाही हॉटेलमध्ये राहण्याची भीती वाटत असेल तर आम्ही तुम्हाला एका अशा गॅजेटबद्दल सांगणार आहोत, जे हीडन कॅमेरे शोधू शकते.

हॉटेलमध्ये राहणे अनेकांसाठी आव्हानापेक्षा कमी नाही. हिडन कॅमेऱ्यांमुळे यापूर्वी गैरप्रकाराची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. त्यामुळे लोक हॉटेलमध्ये राहण्यास घाबरतात. तुम्हालाही हॉटेलमध्ये राहण्याची भीती वाटत असेल, तर आम्ही तुम्हाला अशा गॅजेटबद्दल सांगणार आहोत, जे हिडन कॅमेरे शोधून काढते.

आम्ही ज्या डिवाइसबद्दल बोलत आहोत त्याला हिडन कॅमेरा फाइंडर असे म्हणतात. ते एक कीचेनसारखे अतिशय लहान आकाराचे डिवाइस आहे, ज्यामध्ये काही एलईडी लाइट्स तसेच इन्फ्रारेड लाइट्स आहेत. हे डिव्हाईस वापरण्यासाठी त्याच्या आत आधीपासून एक बॅटरी इन्स्टॉल केलेली आहे आणि त्यामध्ये व्यूफाइंडरदेखील आहे. तुम्हाला या डिवाइसच्या मदतीने हिडन कॅमेरा शोधायचा असेल, तर तुम्हाला तो चालू करावे लागेल आणि हिडन कॅमेरा बसवला जाऊ शकतो अशा ठिकाणी न्यावे लागेल. कॅमेरा बसवण्यात आला असेल तर तो या डिवाइसच्या मदतीने दिसेल आणि तुम्ही त्याबाबत तक्रार करू शकता आणि अशा लोकांवर कारवाईही करू शकता.


हॉटेलच्या रूमध्ये जे काही सामान आधीच ठेवलेले आहे तेही चेक करावे. याचे कारण असे की बरेचदा लोक हॉटेलच्या रूममध्ये सामानाच्या मागे कॅमेरा लपवतात. तुम्ही लाइट्स, एसी, पॉवर अडॅप्टर, अलार्म सेन्सर आणि टेलिफोन तपासणे आवश्यक आहे. याशिवाय रूमचे बाथरूमही चेक करावे. याशिवाय टूथब्रश होल्डर, टॅप, बाथरूमच्या दरवाजाच्या व खिडकीच्या मागेही चेक करायला विसरू नका. हॉटेल किंवा ट्रायल रुममध्ये लावण्यात आलेल्या मोबाईल, कॉम्प्युटर आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचीही माहिती या ॲपमध्ये मिळते.

# आज जागतिक सायकल दिन

जागतिक सायकल दिन सायकल वापरण्याच्या फायद्यांकडे लक्ष वेधतो-एक साधे, परवडणारे, स्वच्छ आणि पर्यावरणास अनुकूल टिकाऊ वाहतुकीचे साधन. सायकल स्वच्छ हवा आणि कमी गर्दीत योगदान देते आणि सर्वांत असुरक्षित लोकसंख्येसाठी शिक्षण, आरोग्यसेवा आणि इतर सामाजिक सेवा अधिक सुलभ बनवते. शाश्वत वाहतूक व्यवस्था जी आर्थिक वाढीला चालना देते, असमानता कमी करते आणि हवामान बदलाविरुद्धच्या लढ्याला बळ देते ती शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे.

१५ मार्च २०२२ रोजी सर्वसाधारण सभेने शाश्वत विकासासाठी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सायकल चालवण्याच्या मुख्य प्रवाहात एकात्मतेचा ठराव मंजूर केला. सायकल हे शाश्वत वाहतुकीचे साधन आहे आणि शाश्वत उपभोग आणि उत्पादनाला चालना देण्यासाठी सकारात्मक संदेश देते आणि हवामानावर त्याचा सकारात्मक परिणाम होतो यावर जोर देण्यात आला.

दोन शतकांपासून वापरात असलेल्या सायकलचे वेगळेपण, दीर्घायुष्य आणि अष्टपैलुत्व मान्य करून आणि ती एक साधी, परवडणारी, विश्वासार्ह, स्वच्छ आणि



**निमित्त**

पर्यावरणास अनुकूल अशी शाश्वत वाहतूक, पर्यावरणीय कारभारीपणा आणि आरोग्याला चालना देणारी आहे, असा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतला. ३ जून हा जागतिक सायकल दिन घोषित करण्यात आला.

शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी, शारिरीक शिक्षणासह शिक्षण बळकट करण्यासाठी, मुलांसाठी व तरुण लोकांसाठी, आरोग्याचा प्रचार, रोग प्रतिबंधक, सहिष्णुता, परस्पर समंजसपणा आणि आदर वाढवणे आणि सामाजिक समावेश सुलभ करण्यासाठी सायकलच्या वापरावर जोर देण्यासाठी आणि पुढे जाण्यासाठी भागधारकांना प्रोत्साहन दिले. आणि शांततेची संस्कृती.

शारीरिक, मानसिक आरोग्य आणि आरोग्य मजबूत करण्यासाठी आणि समाजात सायकल चालवण्याची संस्कृती विकसित करण्यासाठी राष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर सायकल चालवण्याच्या उपक्रमांचे विधानसभेने स्वागत केले.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएचओ)च्या मते, चालणे आणि सायकलिंगसाठी सुरक्षित पायाभूत सुविधादेखील अधिक आरोग्य समानता प्राप्त करण्याचा एक मार्ग आहे. सर्वात गरीब शहरी क्षेत्रासाठी, ज्यांना सहसा खाजगी वाहने परवडत नाहीत, चालणे आणि सायकल चालवणे हृदयविकार, पक्षाघात, विशिष्ट कर्करोग, मधुमेह आणि मृत्यूचा धोका कमी करून वाहतुकीचे एक प्रकार प्रदान करू शकते. त्यानुसार सुधारित सक्रिय वाहतूक केवळ आरोग्यदायी नाही; ते न्याय्य आणि किफायतशीरदेखील आहे.

चालणे व सायकल चालवणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करणे हे शहरांना वाढत्या उत्सर्जनापासून जोडप्यांची लोकसंख्या वाढण्यास मदत करण्यासाठी, हवेची गुणवत्ता आणि रस्ता सुरक्षा सुधारण्यासाठी गतिशीलता समाधानाचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. यंदाची जागतिक सायकल दिनासाठी नियुक्त केलेली थीम सायकलिंगद्वारे आरोग्य, समानता आणि टिकाऊपणाला प्रोत्साहन देणे आहे.


**क्लिक...क्लिक...!**



**सुधागड : पावसाळा तोंडावर आला आहे. या काळात मासेमारी बंद असल्याने मुबलक प्रमाणात मच्छी मिळत नाही. त्यामुळे लोक सुकी मासळी खरेदी करून साठवणूक करतात. रस्त्यावर बसलेल्या विक्रेत्यांकडून पावसाळ्याची बेगमी करताना मांसाहारी खवय्ये.**

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात अक्रोड खाण्याचे फायदे



सुक्या मेव्यामध्ये अक्रोड आरोग्यासाठी खूप उपयोगी असून यामध्ये जीवनसत्त्वे मुबलक प्रमाणात असतात जे आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. अक्रोड हे पोषक तत्वांनी युक्त एक अतिशय पौष्टिक ड्रायफ्रूट आहे. यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, प्रथिने आणि इतर अनेक आवश्यक गोष्टी आढळतात ज्या आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर असतात. उन्हाळ्यात अक्रोड पाण्यात भिजवून खावे. यामुळे अक्रोड अधिक पौष्टिक बनते आणि उष्णता दूर होते.

उन्हाळ्यात भिजवलेले अक्रोड खावे. यामुळे उष्णता दूर होते आणि पौष्टिक घटक वाढतात. अक्रोड रात्रभर स्वच्छ पाण्यात भिजवून ठेवा आणि सकाळी भिजवलेले अक्रोड खा. मात्र, हिवाळ्यात तुम्ही अक्रोड न भिजवता खाऊ शकता.

अक्रोड खाल्ल्याने मेंदू तीक्ष्ण होतो. अक्रोडमध्ये व्हिटॅमिन ई, ओमेगा ३, फॅटी ॲसिड आणि अँटीऑक्सिडंट्स यांसारखे पोषक घटक असतात जे मेंदूला निरोगी ठेवण्यास मदत करतात. हे मेंदूच्या पेशींचे नुकसान होण्यापासून संरक्षण करतात आणि न्यूरॉन्स टिकवून ठेवण्यास मदत करतात.अक्रोड खाल्ल्याने मेंदूतील रक्ताभिसरण वाढते, ज्यामुळे ऑक्सिजन आणि पोषक घटक मेंदूपर्यंत सहज पोहोचतात. याशिवाय अक्रोडमध्ये असलेले एल-कार्निटाइन मेंदूचे कार्य सुधारते. हे खाल्ल्याने स्मरणशक्ती वाढते, लक्ष केंद्रित करण्यास मदत होते आणि तणाव आणि चिंतेपासून आराम मिळतो.

अक्रोड खाल्ल्याने त्वचा मऊ राहते. त्यामुळे तुमची त्वचा मऊ आणि कोमल ठेवायची असेल तर रोज अक्रोड खा. यामुळे तुम्हाला सुंदर आणि निरोगी त्वचा मिळेल. वाढत्या वयाबरोबर त्वचेवर सुरकुत्या पडणे सामान्य गोष्ट आहे, पण अक्रोड खाल्ल्याने या सुरकुत्या कमी होऊ शकतात.

अनेक संशोधनातून असे समोर आले आहे की अक्रोड खराब कोलेस्ट्रॉल कमी करते. यामुळे हृदयविकाराचा धोका खूप कमी होतो.

# बिरवाडीत वाहतूक कोंडीची समस्या

**महाड : प्रतिनिधी**

महाड औद्योगिक वसाहतीमधील बिरवाडी गावात असलेली वाहतूक कोंडीची समस्या आजही कायम आहे. त्यामुळे वाहनचालक, शालेय विद्यार्थी, महिला आणि वयोवृद्ध नागरिकांना याचा मोठा त्रास होत आहे. बिरवाडी ग्रामपंचायत आणि पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. या सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीने नागरिक, महिला आणि विद्यार्थी संताप व्यक्त करत आहेत.



महाड औद्योगिक क्षेत्राचा विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. एमआयडीसीचा बहुतांश भाग हा बिरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत येत असल्याने बिरवाडी गावाचा विकास आणि विस्तार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. शिवाय महाड औद्योगिक परिसरातील वाळण, वरंध विभागातील नागरिकांना बिरवाडी ही जवळची बाजारपेठ असल्याने याठिकाणी खरेदीसाठी मोठी गर्दी असते. महाड औद्योगिक वसाहतीमधील निरवाडी श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून ओळखले जाते, मात्र तरीदेखील योग्य नियोजन होत नसल्याने वाहतूक कोंडी सारख्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. दिवसेंदिवस वाढती लोकसंख्या आणि इमारतींचे बांधकाम याबाबत परवाने देत असताना ग्रामपंचायतीने वाहन पार्किंग, घनकचरा व्यवस्थापन आदींबाबत संबंधित विकासकांना सूचना देणे आवश्यक आहे, मात्र नियोजनाचा विचार न करताच परवाने दिले जात असल्याने इमारतींची संख्यादेखील दिवसेंदिवस वाढत चालली आहे. बिरवाडीमधील वाढता विस्तार आणि वाढती लोकसंख्या यामुळे नियोजनबद्ध आराखडा मात्र केला जात नसल्याने नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. विविध समस्यांबरोबर बिरवाडीमध्ये वाहतूक कोंडीची मोठी समस्या निर्माण झाली आहे.

अरुंद रस्ते आणि दुकानांच्या समोरील वाढलेल्या शेड यांनी अधिक अरुंद असलेला रस्ता वाहतुकीस अपुरा पडत आहे. बिरवाडीमधील मुख्य बाजारपेठदेखील अरुंद होत चालली आहे. याचा त्रास बाजारपेठेत येणाऱ्या नागरिकांना होत आहे. महाड औद्योगिक पोलीस ठाण्याकडून बिरवाडी मध्ये पोलीस चौकी उभी केली असली तरी या ठिकाणी पोलीस कायमस्वरूपी नसल्याने वाहन चालकांची मनमानी वाढत चालली आहे. बिरवाडीमध्ये मुख्य रस्त्यावर दोन्ही बाजूने वाहने पार्क केली जातात यामुळे अवजड वाहने तसेच एसटी बसेसना मोठा अडथळा निर्माण होतो. अशावेळी वाहतूक कोंडीला नागरिकांना कायम सामोरे जावे लागत आहे. याठिकाणी असलेल्या मिनिडोर रिक्षाचालक देखील आपल्या रिक्षा दुतर्फा लावून बसत आहेत. बिरवाडीमध्ये असलेल्या विद्यालयातील विद्यार्थ्यांनादेखील या वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना त्रास होतो, मात्र तरीदेखील बिरवाडी ग्रामपंचायतीने याबाबतीत कधीच ठोस पावले उचललेली नाही.

बिरवाडीमधील मुख्य रस्त्यावर चालकदेखील रस्त्यावरच आपले रिक्षा उभी करून प्रवासी वाट पाहत असतात. वाहतूक कोंडी किंवा अवजड वाहने आल्यानंतर आपली रिक्षा बाजूला करत नाहीत. त्याचप्रमाणे दुकानदारदेखील दुकानातील सामान ठेवत असल्याने वाहतूक कोंडीस हातभार लागतो. अनधिकृत शेडबाबत अथवा वाहनांचे पार्किंग नियोजन करण्याबाबत ग्रामपंचायतीला रस नसल्याचे दिसून येते. पोलिसांचीही कडक कारवाई अपेक्षित आहे.

# खालापुरात १७ गावे दरडप्रणव

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात गेल्या वर्षी नऊ गावांचा दरडप्रणव क्षेत्रात समावेश होतो. त्यात आणखी आठ गावांचा समावेश झाला असून सुभाषनगर खोपोली जीएसआयच्या अहवाला नुसार वर्ग-१ मध्य असल्याने तेथे सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी मान्सून पूर्व तयारीची बैठक व आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण या दोन्ही गोष्टींचा अभ्यास केला असून नैसर्गिक आपत्तीस सामोरे जाण्याची तयारी केली आहे. सुभाष नगर वर्ग १, दत्तवाडी वर्ग ३, तोंडली वर्ग ३ यांचा जीएसआय सर्व्हे झाला असून काजूवाडी, ताडवाडी, गारभाट धनगरवाडी, बिडखुर्द, जांबरुंग, चिंचवली गोहे यांचा जीएसआय सर्व्हे झालेला नाही. तर टेंबेवाडी, जंगमवाडी, चांगवाडी, हाशाची पट्टी, काटवन, ढेबेवाडी - बर्गेवाडी, मुठा (माडप ठाकूरवाडी) व वीरगाव (कुंभीवली ठाकूरवाडी) या आठ गावांचा नव्याने संभाव्य दरडप्रणव म्हणून आराखड्यात सामाविष्ट करण्यात आली आहेत, मात्र यांचाही जीएसआय सर्व्हे झाला नाही. यातील सुभाष नगर यांचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांनी दिली.

आपत्ती प्रसंग येऊ नये, पण नैसर्गिक आपत्तीस तोंड देण्यास खालापूर महसुल प्रशासन तयार असून त्या त्या विभागाचे मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामविकास अधिकारी,ग्रामसेवक, पोलीस पाटील यांना निर्देश दिले असुन आपत्ती काळात कुठेही गाव वस्ती सोडून जायचे नाही, मोबाईल बंद न ठेवणे आणि आपत्ती काळातील तयारी ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत, असे खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी सांगितले.

# खालापूर तालुक्यातील रस्ते काँक्रीटीकरण कामाला वेग

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापुर तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील रस्त्यांची अवस्था खड्ड्यात रस्ता की, रस्त्यात खड्डा हे अशी असून या खड्ड्यामुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

असाच त्रास माणकिवली ग्रामपंचायत हद्दीतील माणकिवली - शेणगाव परीसरामधील प्रवासी व रहिवाशांना करावा लागत होता, गेल्या अनेक वर्षांपासून येथील मुख्य रस्ता खड्ड्याच्या विळख्यात सापडल्याने अनेक जण खड्ड्याच्या त्रासाला अक्षरशः कंटाळले होते. तर येथील नागरिकांची समस्या लक्षात घेत स्थानिक ग्रामपंचायतीने आमदार महेंद्र थोरवे यांच्याकडे पाठपुरावा केला असता त्यांनी या समस्येची दखल घेत या ठिकाणी निधी उपलब्ध करून दिल्याने हा खड्डेमय रस्ता आता काँक्रिटीकरण झाल्याने पुढील काळात येथील प्रवाशांचा प्रवास सुखकर होणार असून काँक्रिटीकरण काम अत्यंत चांगल्या दर्जाचे होत असल्याने समाधान व्यक्त होत आहे.

रस्त्याचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्णत्वास गेल्याने सर्वजण या कामाबाबत समाधान व्यक्त करीत असून पाठपुरावा करणाऱ्या सर्वांचे आभार मानत आमदार महेंद्र थोरवे यांच्या कामगिरीचे कौतुक करीत असताना काँक्रीटीकरणाचे काम उत्तम दर्जाचे झाल्याने परिसरातील नागरीक आनंदीत झाले आहेत.

**माणकिवली रस्त्याच्या काँक्रीटीकरणाच्या कामाने वेग घेतल्याने पुढील काळात माणकिवलीसह शेणगाव परिसरातील ग्रामस्थांसह प्रवाशांचा येथून प्रवास सुखकर होणार असून अनेक वर्ष खड्ड्यातून होणारा प्रवास आता खड्डे मुक्त होणार आहे. त्यामुळे सर्वजण समाधान व्यक्त करत आहेत.**
**-चंदन भारती, माजी सरपंच तथा विद्यमान सदस्य**



# मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर वीकेण्डला वाहनांच्या प्रचंड रांगा



**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस बोरघाटात शनिवारी मध्यरात्रीपासून वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्याने, मुंबईहून पुण्याला जाणाऱ्या वाहनचलकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

वीकेंडला नेहमीचे मुंबई पुणे एक्सप्रेसवे विशेषता घाट सेक्शनला जाम होण्याचे नेहमीचे प्रकार झाले आहे. सुट्टीचा आनंद घेण्यासाठी मुंबईकर मोठ्या प्रमाणात लोणावळा, खंडाळा, पुणे, येथील पर्यटन स्थळावर येत असतात. मोठ्या प्रमाणात वाहने आल्याने घाट सेक्शनला विशेषतः बोरघाटात वाहतूक कोंडी होत असते.

शुक्रवारी मोठ्या प्रमाणात वाहने आल्याने मध्यरात्रीपासून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुमारे नऊ किलोमीटर पर्यंत रांगाच रांगा पहावयास मिळाल्या. त्यामुळे वाहतूक यंत्रणेची तारांबळ उडाली. ही वाहतूक कोंडी शनिवारी दुपारी १च्या दरम्यान सुटली आणि वाहतूक पोलिसांनी सुटकेचा निस्वास सोडला.

शनिवारी दुपारी एक वाजल्यापासून मुंबई पुणे महामार्गावर वाहतूक सुरळीत आहे, असे बोरघाट वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश भोसले यांनी सांगितले.



# कर्जतमध्ये मुलींना सायकलचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

सद्भाव फाउंडेशन मुंबई शाखा कर्जत यांच्या सौजन्याने ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाकरिता प्रवास साधन म्हणून मोफत सायकलीचे वाटप करण्यात आले.

सद्भाव फाउंडेशन एक सामाजिक संस्था असून कर्जत व खालापूर ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक व सामाजिक विकास करण्यासाठी संस्था नेहमी प्रयत्न करत असते. ग्रामीण भागातील मुली शिक्षणाकरीता तीन ते चार किलोमीटर अंतरावरून चालत येत असतात अशा गरजू मुलींना संस्थेतर्फे मोफत ७७ सायकलींचे वाटप करण्यात आले.

संस्थेच्या ट्रस्टी निता जोशी यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाखाली संस्थेचे कर्मचारी प्रवीण पाटील, प्रगती पाटील, संतोष ढाकवळ, प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड यांनी वाटप केले.

## अर्चना खोत यांची निवड

**मुरूड** : तालुक्यातील यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका म्हणून शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका अर्चना उदय खोत यांची निवड करण्यात आली आहे.

विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.आर. ओव्हाळ हे नियत वयोमानानुसार ३१ मे रोजी निवृत्त झाले. त्यांच्या जागेवर अर्चना खोत यांची सहजीवन विद्या मंडळाच्या सर्व सदस्यांनी एकमताने निवड केली. त्यानुसार मंडळाचे अध्यक्ष फैरोज घलटे व अन्य सदस्यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ता. पनवेल, जि. रायगड | | | | | | | | |
| १ | खारघर ३४५ | ओवे ५८४(P) | २२९/३ | ०-०६-८ | ४० चौ.मी. | भूखंड क्र. ४८, सेक्टर-१८, क्षेत्र-४० चौ.मी. | श्री. शांताराम काना पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, समस्या निवारण केंद्र, खिडकी क्र. १०, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०३५/२०२४-२५


**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**सहकार विभाग, महाराष्ट्र शासन नियुक्त**
**व्दारा : कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल; ६२६ ओ/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारुती मंदीरा शेजारी, टिळक रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६. मोबाइल नंबर ८०८२५५५४०८**

जाहिरात तात्काळ
**नमुना झेड**
नियम १०७ पोट-नियम (११ (ड ११) पहा)
स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही केलेले वसुली अधिकारी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल हे महाराष्ट्र महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असून दि. २३.०३.२०२३ रोजी ऋणको १) श्री. आतिफ निजाम कागदी २) श्री. सुधाकर ज्ञानोबा कोकाटे ३) श्री. राजकुमार दूधनाथ सरोज यांना मागणी नोटीस देऊनही नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम रू.३,५७,४७५/- (अक्षरी रूपये तीन लाख सत्तावन्न हजार चारशे पंच्याहत्तर मात्र.) सदर नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत भरणेबाबत कळविले होते आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे, त्यामुळे खाली सही करणार यांनी दि. ३१.०८. २०२३ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली स्थावर मालमत्ता १७.०२.२०२४ रोजी जप्त करण्यात आली आहे -

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटिस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ मधील नियम १०७ पोट-नियम[११ (ड-११)]अन्वये दिलेल्या अधिकारानुसार दि. १७.०२.२०२४ रोजी मिळकतीचा ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल शाखा खोपोली यांच्या कर्जाच्या बोजाची रक्कम रू.३,५७,४७५/- (अक्षरी रूपये तीन लाख सत्तावन्न हजार चारशे पंच्याहत्तर मात्र) आणि त्यावरील व्याज याला आधीन रहावे लागेल.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (नमुना 'झेड')**
स्थावर मालमत्तेचे वर्णन

मौजे खोपोली नगरपरिषद हद्दीतील आणि सब रजिस्ट्रार खालापूर यांचे अधिकार क्षेत्रातील ॲक्सकोन ॲव्हेन्यू या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीमधील तळ मजल्यावरील शॉप/गाळा नं. २, क्षेत्रफळ २४५ चौ. फुट म्हणजेच २२.७७ चौ. मिटर (कारपेट एरिया) खोपोली नगरपरिषद जुना घर क. ८८/१/यु. नविन घर क. डब्ल्यु २८ झेड १०००५५६.

| गावाचे नाव | मालमत्ता धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|
| मौजे खोपोली बाजारपेठ, नगरपरिषद खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड. | श्री. आतिफ निजाम कागदी | मौजे खोपोली नगरपरिषद हद्दीतील आणि सब रजिस्ट्रार खालापूर यांचे अधिकार क्षेत्रातील तळ मजल्यावरील शॉप/गाळा नं. २, क्षेत्रफळ २४५ चौ. फुट म्हणजेच २२.७७ चौ. मिटर (कारपेट एरिया) खोपोली नगरपरिषद जुना घर क. ८८/१/यु. नविन घर क. डब्ल्यु २८ झेड १०००५५६. | २४५ चौ. फुट म्हणजेच २२. ७७ चौ. मिटर कारपेट एरिया |

**दिनांक : ०१/०६/२०२४**
**ठिकाण : पनवेल**

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
वसुली व विकी अधिकारी
महाराष्ट्र शासन (सहकार खाते)

**Shri. Sunil Sadanand Gadre**
**Recovery Officer**
Government of Maharashtra, (Co-Op.Department)
Office: Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit, Panvel. 626 A/7B, Shrikrushna Nivas, Near Ramdas Maruti Mandir, Tilak Road, Panvel,Dist:- Raigad
Pin Code: 410 206, Mobile No. 8082555408, kamalmahila@yahoo.in

Ref. No. Date:- 01/06/2024

**FORM Z**
(See Sub-rule [11(d-11)] of rule 107)
Possession Notice For Immoveble Property

Whereas the undersigned being the Recovery Officer of **Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit, Panvel** Under The Maharashtra Co-operative Societies Rule, 1961 issued a demand notice dated 23/03/2023 calling upon the judgment debtor **1) Mr. Atif Nizam Kagadi, 2) Mr. Sudhakar Dnyanoba Kokate, 3) Mr. Rajkumar Dudhnath Saroj** to repay the amount mentioned in the notice being **Rs. 357475/- (Rs. Three Lakh Fifty Seven Thousand Four Hundred Seventy Five Only)** with date of receipt of the said notice and the judgment debtor having failed to repay the amount, the undersigned has issued a notice for attachment dated 31/08/2023 and attached the property describe herein below and same has been attached the property on 17/02/2024.

The judgment debtor having failed to repay the amount, notice is hereby given to the judgments debtors and the public in general that the undersigned has taken possession of the property described herein below in exercise of powers conferred on her under rule 107 [11(d-11)] of The Maharashtra Co-operative Societies Rule, 1961 on this **17/02/2024**

The judgment debtors in particular and the public in general are hereby cautioned not to deal with the property and any dealings with the property will be subject to the charge of **The Kamal Mahila Nagari Sahakari Patpedhi Maryadit Panvel** Khopoli Branch for an amount **Rs. 357475/- (Rs. Three Lakh Fifty Seven Thousand Four Hundred Seventy Five Only)** and interest thereon.

**Description of the Immovable Property**

| Village | Name Of the Property owner | Discription of Property | Area |
|---|---|---|---|
| At- Khopoli Bazarpethe, Khopoli Nagarparishad, Tal-Khalapur, Dist- Raigad. | Mr. Atif Nizam Kagadi | Khopoli Nagarparishad, Khopoli, Tal- Khalapur, Dist- Raigad, Ground floor, Shop No. 2, Area 245 Sq. Ft. means 22.77 Sq. Meter Carpet. Khopoli Nagarparishad old house no. 88/1/U. New house no. W 28 Z 1000556. | 245 Sq. Ft. means 22.77 Sq-meter Carpet |

All that Part and parcel of the property located at Panvel, Tal- Panvel, Dist Raigad, within the registration Tahasil Panvel And District Raigad.

Date: 01/06/2024
Place: Panvel

**Sd/-**
**(Sunil Sadanand Gadre)**
Recovery Officer
Maharashtra Government
[Co-operative Department]

# जमिनीला भेगा आणि घरांना तडे

## पोलादपुरातील करंजे पायटेवाडीतील प्रकार; तहसीलदारांकडून पाहणी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील करंजे गावच्या पायटेवाडी येथे जमिनीला भेगा पडल्या आहेत. याची माहिती मिळताच तहसीलदार कपिल घोरपडे यांनी घटनास्थळाची पाहणी केली. यापूर्वी २००५मध्ये तालुक्यातील बोरावळे गावात, तर २०२१मध्ये वाकण गावामध्येही अशा दूरवर भेगा पडल्या होत्या. यामुळे यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी तसेच भूस्खलन होण्याचे हे नैसर्गिक संकेत तर नाही ना, अशी साशंकता व्यक्त होत आहे.





करंजे पायटेवाडी येथील शेतकरी पांडुरंग धोंडू घाडगे यांच्या भातशेताच्या जमिनीत भेगा पडल्याची माहिती ग्रामस्थ सुभाष घाडगे यांनी दिली असता तहसीलदार कपिल घोरपडे यांनी तातडीने करंजे पायटेवाडी येथे सहकाऱ्यांसमवेत जाऊन पाहणी केली आहे. या वेळी ग्रामस्थांनी काही घरांच्या भिंतींनाही या भेगांमुळे तडे गेल्याचे तहसिलदारांच्या निदर्शनास आणून दिले आहे. पायटेवाडी परिसरातील संभाव्य धोका लक्षात घेऊन येथील जवळपासच्या लोकवस्तीतील नागरिकांना अतिवृष्टीच्या काळात करंजे गावातील शाळेत तसेच समाजमंदिरात स्थलांतरित करण्याच्या सूचना तसेच त्यांच्या राहण्याची जेवणाची व अन्य सुविधा पोहचविण्याबाबत निर्देश दिले आहेत. या संदर्भात तहसीलदार घोरपडे यांनी गटविकास अधिकारी दिप्ती गाट यांना सूचना दिल्या असून बांधकाम उपविभाग पोलादपूर कार्यालयाला परिस्थितीची पडताळणी करण्यासंदर्भात आदेश दिले आहेत.

पोलादपूर तालुक्यातील यापूर्वीच्या प्रत्येक अतिवृष्टी व भूस्खलनाच्या घटनांपूर्वी कुठल्या ना कुठल्या गावात मोठ्या लांबीच्या आणि सुमारे एक फूट रूंदीच्या भेगा पडल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असून संभाव्य नैसर्गिक आपत्तीची ही पूर्वसूचना किंवा नैसर्गिक संकेत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. आगामी पावसाळ्यात अतिवृष्टीदरम्यान कोणतीही नैसर्गिक आपत्ती उद्‌भल्यास प्रशासन सज्ज असून जनतेनेदेखील प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन तहसीलदारांनी या वेळी केले.

# रेवदंड्यात मध्यरात्री वयोवृद्ध महिलेस लुटले

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा आगरकोट किल्ल्यात पुरातन सिध्देश्वर मंदिराच्या बाजूला एकटीच रहात असलेल्या सत्तर वर्षीय विधवा महिलेस मध्यरात्रीस हेल्मेटधारी युवकाने पाणी पिण्याचे बहाण्याने घरात घुसून चाकूचा धाक दाखवून लूटले. लुटारूने महिलेचे हातपाय नायलॉन दोरीने बांधून व तोंडात कापसाचा बोळा कोबून सोन्याचे दागिने व रोख रकम घेऊन पोबारा केल्याची घटना घडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

रेवदंडा आगरकोट किल्लात श्री सिध्देवर मंदिराशेजारी सत्तर वर्षीय रेश्मा रमेश पाटील या वयोवृद्ध विधवा महिला एकट्याच रहातात. १ जून रोजी रात्री बारा ते दीडच्या सुमारास अज्ञात हेल्मेटधारी मोटरसायकलस्वाराने घराचा दरवाजा ठोकावला व पाणी पिण्यासाठी मागितले. पाणी देण्यासाठी रेश्मा पाटील यांनी दरवाजा उघडला असता अज्ञात हेल्मेटधारी घरात शिरला व त्याने चाकुचा धाक दाखवित त्यांचे हातपाय नायलॉन दोरीने बांधले व तोंडात कापसाचा बोळा कोंबून त्यांच्या कानातील सोन्याच्या कुड्या जबरीने काढून घेतल्या व घरातील कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवलेल्या डब्यातील सोन्याची बोरमाळ तसेच रोख रक्कम २५ हजार रुपये असा एकूण एक लाख २५ हजार रुपये किमतीचा माल जबरी चोरी केला. त्यानंतर पाटील यांना किचन रूममध्ये बांधून व कोंडून तो पळून गेला.

याबाबत रेश्मा रमेश पाटील यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे फिर्याद नोंदविली असून त्यानुसार अज्ञात हेल्मेटधारी चोरट्याच्या विरोधात भा.दं. वि. कलम ३९२,४५२,३२४ नुसार जबरी चोरीचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

दरम्यान, अलिबाग येथील उपविभागीय पोलीस अधिकारी विनित चौधरी यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक श्रीकांत किरविले यांनी घडलेल्या घटनेबाबत गुन्हा नोंदविला असून अधिक तपास सुरू आहे.

# पेणमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे कंपन्यांसह अनेकांना गंडा

**पेण : प्रतिनिधी**

बनावट कागदपत्रांद्वारे लाखो रुपयांचे कर्ज काढून बँकेसह कार कंपन्यांना तसेच फिर्यादी यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याची घटना पेणमध्ये घडली आहे. याबाबत फिर्यादी शंकरसिंह सरदारसिंह राजपुरोहित (वय ४२) रा. सद्गुरू पार्क, कुंभार आळी, पेण यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार जाना स्मॉल फायनान्स लि. पनवेल येथे आरोपी ओमकार रामकृष्ण दीक्षित, आरोपी वर्षा (पूर्ण नाव माहीत नाही), जाना स्मॉल फायनान्स लि. चे जुन महिन्यातील ब्रँच मॅनेजर व इतर सहकारी यांनी जून २०२३ ते आतापर्यंत फिर्यादी व साक्षीदार यांचे नावे प्रिफर फायनान्स या कंपनीकडुन १,५७,००० रुपये कर्ज घेतले. यासाठी फिर्यादी यांच्या खोट्या सहया करून फिर्यादी व साक्षीदार यांना कार लोनसाठी आयसीआयसीआय बँकमध्ये खोटे खाते तयार करून सदर खात्यामध्ये एल अँड टी या फायनान्स या कंपनीकडुन १,५७००० रुपये तसेच प्रिपर फायनान्स या कंपनीकडुन ३,५७,००० एवढे कर्ज घेवुन फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणुक केली.

या प्रकरणी आरोपीविरोधात पेण पोलीस ठाण्यात गुन्हा रजि १७०/२२४ भादंवि कलम ४२०, ४६४,४६७,४६८, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास महिला पोलीस उपनिरीक्षक माधुरी घाडगे या करीत आहेत.

## घर बांधून देतो सांगून फसवणूक

**मुरूड** : घर बांधण्यासाठी दोन व्यक्तींना काम दिले, मात्र काम अर्धवट ठेवून त्यांनी पैसे उकळले याबाबत मुरूड पोलीस ठाण्यात उसरोली येथील यशोदा सोनू बिरवाडकर यांनी तक्रार नोंदवली. त्यानुसार दोन व्यक्तींवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पांडुरंग महादेव पाटील (अदाड) व महेश्वर अशोक ठाकूर (खारीकवाडा) यांनी कॉन्ट्रॅक्टर असल्याचे सांगून घर बांधण्यासाठी दोन लाख ४६ हजार रुपये घेतली. घराचे काम कधी पूर्ण करणार असे विचारले असता जीवे मारण्याची धमकी दिली, अशी तक्रार बिरवाडकर यांनी पोलिसांत दिली. त्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे.

# कर्जतमधील वर्षासहलींवरील पर्यटनबंदी उठवा

## आमदार महेंद्र थोरवे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**कर्जत : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाला की कर्जत तालुक्यातील निसर्ग बहरतो. 'धबधब्यांचे गाव' म्हणून कर्जत प्रसिध्द आहे. त्यामुळे या ठिकाणी वर्षा पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी मुंबई, पुण्यातील पर्यटक दाखल होत असतात. मागील सात वर्षांपासून कर्जत तालुक्यातील वर्षा पर्यटनावर बंदीचे सावट आहे. यंदा ही बंदी उठणार असल्याच्या शक्यतेने आशा पल्लवित झाल्या आहेत. आमदार महेंद्र थोरवे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देत यंदा १४४ हे जमावबंदीचे कलम कर्जत तालुक्यात लागू करू नका, असे सूचित केले आहे.

२००५ सालापासून कर्जत तालुक्यातील धबधबे, धरणे प्रकाशझोतात येऊन पर्यटकांच्या आकर्षणाची ठिकाणे बनली आहेत. पावसाळा सुरू झाला की, कर्जत तालुक्यातील निसर्ग हिरवा शालू नेसल्याप्रमाणे बहरतो. त्यामुळे या निसर्गाची भुरळ मुंबई भागातील वर्षासहलप्रेमींना पडते. पावसाळ्यात शनिवार-रविवार मुंबईहून येणाऱ्या रेल्वेगाड्यांमध्ये पर्यटकांचे लोंढे कर्जत तालुक्यात दाखल होत होते. मोठ्या प्रमाणात येणाऱ्या पर्यटनामुळे येथील ग्रामस्थांनादेखील रोजगार उपलब्ध झाला, मात्र दर पावसाळ्यात येथील धबधबे, धरण परिसरात येणाऱ्या पर्यटकांचे अपघात होऊन मृत्यू होऊ लागले. त्यामुळे २०१६पासून प्रशासनाने येथील धरणे, धबधबे यावर कलम १४४ अन्वये जमावबंदी लागू करीत पर्यटनस्थळांवर काही नियमान्वये बंदी लागू केली. त्यामुळे येथील पर्यटनस्थळांकडे पर्यटकांनीदेखील पाठ फिरवली. यासह येथील छोटे मोठे उद्योग करणाऱ्या ग्रामस्थांवर संक्रांत आली. गेली सात वर्षे ही बंदी पावसाळ्यात लागू केली जाते.

कर्जत तालुक्यातील पर्यटन वाढावे यासाठी आमदार महेंद्र थोरवे आग्रही आहेत. तालुक्यात कोणतेही औद्योगिक क्षेत्र नाही. त्यामुळे हरित पट्टा असलेल्या कर्जतमध्ये पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार मिळावा यासाठी थोरवे यांच्याकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत, मात्र वर्षा सहलीवरील बंदी हा मुद्दा दरवर्षी येत असल्याने यंदा याविरोधात आमदार थोरवे यांनी दंड थोपटले आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात कर्जत तालुक्यातील पर्यटनस्थळे पर्यटकांनी बहरतील असे संकेत असले तरी प्रशासन होणाऱ्या अपघातांबद्दल काय उपाययोजना करते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

> **कर्जत तालुक्याला निसर्गसौंदर्याचं लेणं मिळालं आहे. या ठिकाणी कोणतीही औद्योगिक इंडस्ट्री नाही. त्यामुळे खरंतर येथे ग्रीन इंडस्ट्री उभी करण्यासाठी आम्ही शासनाकडून प्रयत्न करीत आहोत, जेणेकरून येथील नागरिकांना रोजगार उपलब्ध होईल, मात्र वर्षासहलीवर १४४ कलम कर्जत तालुक्यात लागू केल्यामुळे स्थानिकांच्या रोजगारावर गदा आलेली आहे. स्थानिकांना रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी यंदा १४४ कलम लागू न करता अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात अशी विनंती जिल्हाधिकारी रायगड यांना केलेली आहे.**
> **-महेंद्र थोरवे**, आमदार, कर्जत

# कौलारू घरे नामशेष होण्याच्या मार्गावर


**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाचे आगमन होण्याच्या आधी खेडेगावात वेध लागायचे ते आपले घरावर असलेले छपर व्यवस्थित करण्याचे. यासाठी प्रत्येकाची धडपड सुरु असायची. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात कौलारू घरे असल्यामुळे ती कौल सारखी करण्यासाठी प्रत्येकाची लगबग असे, परंतु बदलत्या काळात कौलारू घरे नामशेष होण्याच्या मार्गावर असून घर बांधताना कौल न वापरता सिमेंटच्या पत्र्याचा उपयोग केला जात आहे. यामुळे मातीची कौल इतिहासजमा होत चालली आहे.

आजही शहरासह खेडेगावही बदलत चालले आहे. सिमेंटच्या जंगलांनी घरे व्यापली जात आहेत. खेड्यातील कौलारू घरासह इतरही अनेक बदल होताना आज आपणास पहावयास मिळत आहेत. दरवर्षी पावसाळा सुरू होण्याआधीच कौलारू घरांची डागडुगी करणे गरजेचे असे. याला घर फेरणे म्हणतात.

आज घर फेरणारे कारागीरही दुर्मिळ झाले आहेत. कौलारू घर उन्हाळ्यातही गरम होत नाही. यामुळे ती आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी असायची. मातीची कौल ही उन्हाची झळ स्वत: शोषून ते आपल्या शरीरापर्यंत नैसर्गिक गारवा पोहचवत असते. एसी किंवा कुलरची हवा नैसर्गिक नसल्याने एका मर्यादेनंतर त्यांचे दुष्परिणाम शरीरावर निश्चितच होताना आपणास पहावयास मिळत आहे, पण कौलारू घरे उन्हाळ्यात माणसाचे आरोग्य नीट सांभाळून ठेऊन उन्हाळा सुहह्य करीत असते.

आजही खेड्यात चार-दोन घरे कौलारू दिसतात, मात्र नवीन घर निर्मितीत कौलारू घरे बंद असल्याने हळूहळू अस्तित्वात असणारी कौलारू घरेही नामषेश होत चालली आहेत.



# खालापुरात आयआरबीकडून मान्सूनपूर्व साफसफाईला वेग



**खोपोली : प्रतिनिधी**


शहरातील रस्त्यालगत असलेले पावसाळी गटाराची साफसफाई आयआरबीकडून सुरुवात झाली असून पावसाळ्यात पाणी तुंबण्याच्या समस्यांपासून खालापूरकरांची सुटका होणार आहे.

पावसाळ्यात या भागात मोठ्या प्रमाणात पाणी साठून राहत असल्याने त्याचा निचरा होण्यासाठी आयआरबीकडून रस्त्याच्या दुतर्फा पावसाळी गटार बांधण्यात आले आहेत. या गटारात मोठ्या प्रमाणात पालापाचोळा, दगड माती जमा झाल्याने यंदा पाण्याचा निचरा योग्य न झाल्यास पाणी तुंबण्याची भीती नागरिक व्यक्त करीत होते. आयआरबीकडून पाऊस सुरू होण्यापूर्वी साफसफाई व्हावी, अशी मागणी नागरिकांनी केली होती. त्याची दखल घेत साफसफाई झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# मुरूड-गारंबी रस्त्यावरून प्रवास खडतर

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील शिघ्रे ग्रामपंचायत हद्दीतील गारंबी रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत असल्याने स्थानिकांसह पर्यटकांनी नाराजी दर्शवली आहे. गेल्या वर्षी पावसात हा रस्ता खचल्याने एस्टी वाहतूक बंद करण्यात आली होती.



मुरूड केळघरमार्गे रोहा हा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने महत्त्वाचा व कमी अंतराचा असल्याने या रस्त्यावरून रोज शेकडो वाहने ये-जा करीत असतात, परंतु गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याकडे दुर्लक्ष केल्याने ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. नागशेत, गारंबी, पारंगान, धनगरवाडी, गोपाळवटपर्यंत रस्ता खराब झाला आहे. मुरूड-केळघर रस्त्यावरचे खड्डे बुजावावे याकरिता आठ गावच्या ग्रामस्थांनी मुरूड उपअभियंता बांधकाम विभागाकडे लेखी निवेदन १६ फेब्रुवारी २०२४ रोजी दिले होते. आज चार महिने होऊनही या निवेदनाची दखल घेतली गेली नाही. पावसाळा काही दिवसांवर आला असून या रस्त्यावरील खड्ड्यांमुळे चालकांना आणखी त्रास होणार असून यामुळे अपघात होण्याचीही शक्यता वर्तविण्यात येत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता रमेश गोरे यांना याबाबत विचारले असता ते म्हणाले की, या रस्त्याची टेंडर प्रोसेस झाली होती. एकाने टेंडर भरल्याने पुन्हा रिकॉल करण्यात आला आहे. उद्यापासून रस्तावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात करू असे आश्वासन दिले.

# साई मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावकरांचे श्रद्धास्थान असलेल्या आदर्श समतानगर येथील साई मंदिराचा आठवा वर्धापन दिन सोहळा गुरुवारी (दि.३०) आदर्श समतानगर रहिवाशी मंडळातर्फे भक्तिभावाने व उत्साहात साजरा झाला.

यानिमित्त काकड आरती, पंचारती, होम हवन पूजा, साई भंडारा, साईबाबा पालखी मिरवणूक, धुपारती, बळीराम चव्हाण आणि मंडळी यांचे साई गीतमाला असे कार्यक्रम झाले. या वेळी साईभक्तांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

वर्धापन दिनानिमित्त महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, आमदार भरत गोगावले, उद्योजक सचिन मेहता, शिवसेना प्रवक्ते अ‍ॅड. राजीव साबळे, नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, माणगाव पतसंस्थेचे चेअरमन आनंद यादव, पं.स.चे माजी सभापती संगीता बक्कम, माजी सभापती तथा मंडळाच्या सदस्य नंदिनी बामगुडे, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, दिलीप जाधव, सचिन बोंबले आदींनी दर्शन घेतले.





# हरिभाऊ चौधरी यांच्या स्मरणार्थ 'स्वर्गरथ'चे लोकार्पण

**चौक : रामप्रहर वृत्त**

स्व. हरिभाऊ गोविंद चौधरी यांच्याप्रित्यर्थ चौक ग्रुप ग्रामपंचायत सरपंच रितु ठोंबरे यांच्या हस्ते 'स्वर्गरथ'चे लोकार्पण केले. त्याच्यासोबत रा.जि.प माजी सदस्य सुधीर ठोंबरे, आयव्हीएफचे रायगड जिल्हाध्यक्ष कैलास पोटे, रायगड जिल्हा वैश्य समाज सदस्य विजय आंग्रे, सुरेश (आप्पा) चौधरी आणि अजिंक्य चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.




कार्यक्रमास माजी सरपंच सारिका चौधरी, रोहिणी चौधरी, जयश्री चौधरी, आयव्हीएफचे खजिनदार सुनील भोपतराव, रॉबीन चौधरी, स्मितेश चौधरी, राजन चौधरी, प्रणीत चौधरी, राजा चौधरी, गणेश कदम, चौक ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते. चौक येथील सदानशूर व्यक्तिमत्व चंद्रशेखर हरिभाऊ चौधरी अर्थात लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचे अण्णा. स्व. हरिभाऊ गोविंद चौधरी, स्व. रमाकांत चौधरी, स्व. किशोर वासुदेव जगे यांच्या स्मरणार्थ स्व. हरिभाऊ गोविंद चौधरी यांच्या दहाव्या स्मृतीदिनानिमित्त स्वर्गरथ लोकार्पण कार्यक्रम झाला. धन दौलत असूनदेखील दातृत्व असणारी समाजात फार थोडी माणसे आहेत, परंतु स्वतःच्या तुटपुंज्या कमाईतला वाटा समाजाला देणारे अण्णा चौधरी हे एक नाव आहे. लोकसेवेसाठी आपले जीवन अर्पण करणाऱ्या अण्णांनी स्वखर्चातून बनविलेला स्वर्गरथ (वैकुंठ रथ) अनेक सामान्य, गोरगरिबांची, अंतयात्रा निर्विघ्न पार पडेल यात शंका नाही.

अण्णा मदतीसाठी नेहमीच धावून जातात. दोन वर्षांपूर्वी त्यांनी आई-वडिलांच्या स्मरणार्थ वातानुकूलित अ‍ॅब्युलन्सदेखील लोकार्पण केली. अण्णांचा आदर्श समाजाने घेण्यासारखा आहे. अण्णांचे समाजकार्य अतिशय चांगले आहे. ते कार्य अखंड कार्यरत राहो हीच खरी भाऊंना श्रद्धांजली ठरेल.

# चोरढे येथे योग शिबिर यशस्वी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गुरुकुल आरोग्य योगपीठ (सिद्धगिरी कणेरी मठ कोल्हापूर) व श्री. स. स. काडसिद्धेश्वर सांप्र. गुरुभक्त मंडळ चोरढे यांच्या संयुक्त विद्यमाने २६ व २७ मे दरम्यान हनुमान मंदिरात दोन दिवस योग शिबिर घेण्यात आले. शिबिरात योगाचे महत्त्व, उद्दिष्टे तसेच कराटे, लाठीकाठी याबाबत प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरात राज्यस्तरीय कामगार भूषण पुरस्कार विजेते चंद्रकांत खोत प्रमुख मार्गदर्शक म्हणून लाभले तसेच राष्ट्रीय स्तरावरील योगप्रशिक्षक उत्तम मांदारे यांचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन झाले. शिबिराचे उद्‌घाटन चोरढे सरपंच तृप्ती घाग, सदस्य अनिल चोरढेकर, सदस्या प्रमिला चोरढेकर तसेच आगरी समाज मंडळ चोरढे अध्यक्ष सुनील घाग यांच्या उपस्थितीत झाले.



